cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-२८ | गुरूवार, दि.२२ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

## भुजबळ आता ओबीसी नेते आहेत का ?

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांची मंत्रिपदाची गेल्या बऱ्याच महिन्यांपासून सुरू असलेली प्रतीक्षा अखेर संपली आणि त्यांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश झाला. धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळातून गच्छंती झाल्यानंतर त्यांच्या जागी भुजबळ येतील हे अपेक्षितच होते, पण त्यासाठीही भुजबळांना बरीच वाट पाहावी लागली. भुजबळ हे ओबीसी समाजाचे मातब्बर नेते समजले जातात. त्यांच्या समावेशामुळे महायुती सरकारला ओबीसी समाजाचे पाठबळ लाभेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात असली, तरी भुजबळांच्या मागे आज तेवढा ओबीसी समाज राहिला आहे काय, हा अभ्यासाचा विषय आहे.

## वक्फ म्हणजे धर्म नव्हे, ती केवळ इस्लाममधील धर्मादाय संकल्पना

नवी दिल्ली : भारत सरकारने सर्वोच्च न्यायालयात मोठे विधान करत म्हटले आहे की वक्फ ही इस्लाममधील अनिवार्य धार्मिक प्रथा नसून ती केवळ एक धर्मादाय संकल्पना आहे. वक्फ बाय यूजर सारख्या वादग्रस्त तरतुदी हटवून केंद्राने वक्फ कायद्यात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत, असा ठाम युक्तीवाद केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सुप्रीम कोर्टात केला. वक्फ कायद्यातील बदल, वक्फ म्हणजे काय, सरकारी जमिनीवरील वक्फचा हक्क आणि वक्फ मंडळांमध्ये मुस्लिमेतर सदस्यांची नियुक्ती या सर्व मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयात सध्या सुनावणी सुरू आहे.

# शेतकऱ्यांसाठी साथी, महाविस्तार पोर्टलची सुविधा

## मुख्यमंत्री फडणवीसांनी घेतला खरीप हंगामाचा आढावा

मुंबई । प्रतिनिधी

खरीप हंगामात शेतकऱ्यांची बोगस बियाण्यापासून फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या साथी पोर्टलची मदत घ्यावी, असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी बुधवारी (दि.२१) खरीप आढावा बैठक घेतली. या बैठकीनंतर पत्रकार परिषदेमध्ये बोलताना फडणवीस यांनी महाविस्तार अॅपची माहिती दिली. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि कृषिमंत्री राज्य मंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते.



राज्यात यंदा चांगला पाऊस पडेल, असा अंदाज आहे. त्यामुळे खरीप हंगामात २०४ लाख टन मेट्रिक टन उत्पादनाचं लक्ष्य ठेवल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. यावेळी त्यांनी हवामान खात्याचा अंदाज लक्षात घेऊन नियोजन केले जात असल्याचे सांगितले. तसेच दरवर्षी शेतीमध्ये ५००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असल्याचे फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यामध्ये आवश्यक तेवढा बियांचा आणि खतांचा पुरवठा केला जाईल. त्याचा तुटवडा पडणार नाही. मागील वर्षाचा अनुभव लक्षात घेता कुठले पीक उपयोगी पडेल याचा विचार केला जाणार आहे. तसेच राज्यात अनेक ठिकाणी बोगस बियाणांची विक्री होते. त्यामुळे राज्यात जी बियाणे विकली जातील त्याची साथी पोर्टलवर नोंद करण्यात येणार आहे. त्यामाध्यमातून त्या बियाणांची विक्री कुठे केली गेली, याचा शोध घेतला जाणार आहे. त्यामुळे त्यामध्ये बोगसगिरीला आळा घातला जाणार आहे, असेही फडणवीसांनी सांगितले.

◀◀ पान २ वर

### अॅपमध्ये शेतीशी संबंधित सर्व माहिती

महाविस्तार अॅपमध्ये शेतीशी संबंधित सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामध्ये व्हिडीओही उपलब्ध करुन दिला आहे. यामध्ये मराठीमध्ये चॅट बॉट उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना काही माहिती हवी असल्यास ती त्यांना मिळणार असल्याचे फडणवीस म्हणाले.

### सिबीलची मागणी करणाऱ्या बँकांवर कारवाई

शेतकऱ्यांसाठी बँकांकडून सिबिलची मागणी केली जाणार नाही. अशी मागणी करणाऱ्या शाखेवर कारवाई केली जाणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. दोन दिवसांपूर्वी बँक अधिकाऱ्यांच्या बैठकीतही मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या सिबीलचा मुद्दा उचलून धरला होता. त्याचवेळी त्यांनी अशा बँकावर कारवाई करण्याचा इशारा दिला होता. सांगूनही आणि आरबीआयचे आदेश असतानाही बँकेकडून शेतकऱ्यांचे सिबील बघितले जाते याची तक्रार मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत केली होती.



## कैलास मानसरोवर यात्रा पाच वर्षांनी सुरू

दिल्ली । वृतसंस्था

पाच वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर, जूनमध्ये पुन्हा कैलास मानसरोवर यात्रा सुरू होणार आहे. ही यात्रा ऑगस्टपर्यंत सुरू राहील. या यात्रेसाठी नोंदणीकृत भाविकांच्या निवडीसाठी बुधवारी संगणकीकृत सोडत काढण्यात आली. भाविकांची निवड एका निष्पक्ष, संगणक-निर्मित लिंग संतुलित निवड प्रणालीद्वारे करण्यात आली. परराष्ट्र व्यवहार आणि पर्यावरण, वन आणि हवामान बदल राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी भाविकांसाठी सोडतीचे आयोजन केले. २०२० मध्ये भारत

◀◀ पान २ वर

# बीडच्या प्राथमीक अन् माध्यमीक शिक्षणाधिकाऱ्यांवर ५०० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप !

## भ्रष्टाचाराची चौकशी पूर्ण होईपर्यंत बदली करण्यास शासनाची मनाई, पत्रक काढून दिला आदेश

बीड प्रतिनिधी

**बीड जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागात शिक्षक भरती व फरक देयकांमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भगवान फुलारी व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नागनाथ शिंदे यांची चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांची बदली करण्यात येऊ नये, असे पत्रक शासनाकडून जारी करण्यात आले आहे. या दोघांवर सुमारे ५०० कोटी रूपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप आहे.**

बीडचे नागनाथ शिंदे आणि भगवान फुलारी



या दोघांनी चारशे ते पाचशे कोटी रुपयांचा घोटाळा केला असल्याची तक्रार झाल्यानंतर या प्रकरणी शिक्षण आयुक्त यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत या दोघांची बदली करू नये असे म्हटले आहे. बीड जिल्ह्यात बऱ्याच खासगी शाळांमध्ये २०१२ ते २०१९ या काळात मोठ्या प्रमाणात शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती करण्यात आली. बीडचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी मागील तारखेतील रजिस्टर वापरून त्या त्या काळातील शिक्षणाधिकारी यांच्या सह्या मॅनेज केल्या. याबाबतची सविस्तर तक्रार शासनाकडे करण्यात आली. त्यानंतर शालेय शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्त यांना पत्र पाठवून प्राथमिक चे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक चे नागनाथ शिंदे यांनी केलेल्या चारशे ते पाचशे कोटीच्या घोटाळ्याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत या दोघांची बीडमधून इतरत्र कोठेही बदली करू नये असे म्हटले आहे. आता आयुक्त कार्यालयाकडून याबाबत चौकशीसाठी पथक पाठवण्यात येणार आहे. फुलारी आणि शिंदे यांच्यासहित जे संस्थाचालक यात दोषी आढळतील

◀◀ पान २ वर

# मराठवाड्यात अवकाळीचा कहर!

## वीज कोसळून आतापर्यंत २७ जणांचा मृत्यू, साडेचार हजार हेक्टरचे नुकसान

छ. संभाजीनगर । पतिनिधी

**राज्यासह काही दिवसांपासून अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. मराठवाड्यात वीज कोसळून आतापर्यंत २७ नागरिकांचा मृत्यू झाला. तसेच ४ हजारांहून अधिक हेक्टरवर शेती पिकांचे नुकसान झाल्याची माहिती विभागीय आयुक्त कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.**




राज्यात मे महिन्याच्या सुरूवातीला मशागतीच्या कामाला सुरूवात होते. यात खरिपासाठी जमीन तयार करून ठेवण्याचे काम मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी सुरू होते. ३ मेपासून अचानक आभाळ भरून येणे, विजांचा प्रचंड कडकडाट सुरू झाला. यामुळे मराठवाड्यात विज कोसळून आतापर्यंत २७ नागरिकांचा मृत्यू, तर २१ जण जखमी झाले. यात सर्वाधिक ७ जण जालना जिल्ह्यातील आहेत. त्या पाठोपाठ नांदेड आणि बीडमध्ये

◀◀ पान २ वर

## पंधरा हजारांचा ड्रोन पाडण्यासाठी १५ लाखांचे क्षेपणास्त्र ?

### वडेट्टीवारांचा सवाल

नागपूर । वृतसंस्था




**ऑपरेशन सिंदूरच्या कारवाईवरून देशात राजकारणाला तोंड फुटले असून, महाराष्ट्रातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी पाकिस्तानला प्रत्युत्तर देण्यासाठी अवलंबण्यात आलेल्या पद्धतीवर खोचक टीका केली आहे. तसेच ऑपरेशन सिंदूरबाबत सरकारने पारदर्शकता बाळगून लोकांना योग्य माहिती दिली पाहिजे, असा टोलाही लगावला आहे.**

बुधावारी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरमध्ये

◀◀ पान २ वर

# पशूसंवर्धन विभाग अधिक सक्षम करण्यासाठी पंकजाताईंचा धडाका

## पशूधन विकास अधिकारी पाठोपाठ आता पशुसंवर्धन विभागातील सहायक आयुक्त पदाच्या ३११ जागांसाठी भरती प्रक्रिया सुरु

मुंबई । प्रतिनिधी


**पशुसंवर्धन विभाग सक्षम होण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी मोठ्या जोमाने कामाला सुरुवात केली आहे. पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदांपाठोपाठ आता सहायक आयुक्त, पशुसंवर्धन या ही पदे भरण्याचा निर्णय घेतला असून या पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) जाहिरात प्रसिद्ध करून प्रक्रिया सुरू केली आहे.**



पशुसंवर्धन विभागाचे काम पूर्ण क्षमतेने करण्यासाठी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी एकापाठोपाठ एक असे महत्वाचे निर्णय घेण्याचा धडाका लावला आहे.

◀◀ पान २ वर

## दीड कोटींचे बक्षीस असलेला नक्षल्यांचा सर्वोच्च नेता नंबाला केशव राव चकमकीत ठार



गडचिरोली । वृतसंस्था

छत्तीसगड राज्यातील अबुडमाडच्या जंगलात बुधवारी (दि.२१) सकाळी तेथील डीआरजी पोलिस दलाच्या जवानांशी झालेल्या चकमकीत देशातील नक्षल चळवळीचा सर्वोच्च नेता, पॉलिट ब्युरो सदस्य तथा माओवादी कम्युनिस्ट पार्टीचा महासचिव नंबाला केशव राव उर्फ गगन्ना उर्फ बसव राजू ठार झाला. नंबालावर दीड कोटी रुपयांचे बक्षीस होते. आजपर्यंतच्या इतिहासात छत्तीसगड पोलिसांना मिळालेले हे सर्वांत मोठे यश आहे. या चकमकीत संध्याकाळपर्यंत २७ नक्षलवाद्यांचे

◀◀ पान २ वर

## राज्यातील जमिनींची हिस्सेवाटप मोजणी आता अवघ्या २०० रुपयांत; चंद्रशेखर बावनकुळेंचा निर्णय

मुंबई । वृतसंस्था

राज्यातील शेतकऱ्यांच्या जमीन मोजणीबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. आता शेतीची, जमीनीच्या हिस्सेवाटप मोजणी शुल्कात मोठी कपात करण्यात आली असून आता राज्यातील जमिनींची हिस्सेवाटप मोजणी अवघ्या २०० रुपयांमध्ये होणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी हा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

पूर्वी १००० ते ४००० रुपये प्रति हिस्सा असे आकारण्यात येणारे शुल्क आता अवघ्या २०० रुपयावर करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना जमिनीची मोजणी कमी खर्चात करता येणार आहे. जमीन मोजणी ही शेतकऱ्यांसाठी आणि जमीन मालकांसाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. जमिनीच्या सीमांचे निर्धारण अचूकपणे

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८३.५० क्विंटल | २,५०० | २,९४५ | २,६९२ |
| ज्वारी/हायब्रिड: १३३.०० क्विंटल | १,८५० | ४,५३१ | २,३६६ |
| मका/लोकल:५४.०० क्विंटल | २,००० | २,१८० | २,११६ |
| तूर : ६.०० क्विंटल | ६,६०० | ६,७३० | ६,६४३ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १३२.५० क्विंटल | १,६०१ | २,६४० | २,४३३ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ११८.५० क्विंटल | ४,१०० | ४,३०० | ४,२२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ५,४०० | ६,००० | ५,५८० |

# ना.छगन भुजबळ यांच्या निवडीचा बीडमध्ये जल्लोषात आनंदोत्सव साजरा

## समता परिषदेसह ओबीसी समाजातील विविध संघटनांनी एकत्रित येत पेढे वाटून फटाके फोडून केला जल्लोष

बीड । प्रतिनिधी

**ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल बीड शहरांमध्ये या निवडीचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. समता परिषदेसह ओबीसी समाजातील विविध संघटनांनी एकत्रित येत फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.**



राज्याचे माजी उपमुख्यमंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांना भाजपा महायुतीच्या सरकारने उशिरा का होईना मंत्रिमंडळात समाविष्ट करून घेतल्याने संपूर्ण देशभरात समता परिषदेसह ओबीसी समाजामध्ये आनंद निर्माण झाला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे राज्यातील ओबीसी समाजाने आभार व्यक्त केले असून बीडमध्ये समता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष समीरभाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि समता परिषदेचे राज्य सरचिटणीस अॅड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली मोठा जल्लोष साजरा करण्यात आला. बीड शहरातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याजवळ बुधवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते, ओबीसी समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी एकत्रित येऊन ढोल ताशांच्या गजरात फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. याप्रसंगी ओबीसी समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते नामदेवराव दुधाळ, परीट समाजाचे प्रदेशाध्यक्ष

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# भुजबळ आता ओबीसी नेते आहेत का?

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांची मंत्रिपदाची गेल्या बऱ्याच महिन्यांपासून सुरू असलेली प्रतीक्षा अखेर संपली आणि त्यांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश झाला. धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळातून गच्छंती झाल्यानंतर त्यांच्या जागी भुजबळ येतील हे अपेक्षितच होते, पण त्यासाठीही भुजबळांना बरीच वाट पाहावी लागली. भुजबळ हे ओबीसी समाजाचे मातब्बर नेते समजले जातात. त्यांच्या समावेशामुळे महायुती सरकारला ओबीसी समाजाचे पाठबळ लाभेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात असली, तरी भुजबळांच्या मागे आज तेवढा ओबीसी समाज राहिला आहे काय, हा अभ्यासाचा विषय आहे.

भुजबळ यांच्यावर यापूर्वीच्या काळात भारतीय जनता पक्षाने भ्रष्टाचाराचे अनेक आरोप केले होते, एवढेच नाही तर पहिल्या टर्ममध्ये जेव्हा फडणवीस मुख्यमंत्री झाले होते तेव्हा त्यांनी भुजबळ यांना दीर्घकाळ कारागृहात पाठवले होते. आता याच भुजबळांना घेऊन फडणवीस सरकार चालवणार आहेत, हा विरोधाभासही पटकन लक्षात येण्यासारखा आहे. भुजबळ मंत्री झाल्यानंतर सोशल मीडियावर भुजबळ यांच्याविषयी फडणवीस यांनी पूर्वी केलेली वक्तव्य नव्याने झळकली आणि भुजबळ यांच्याबरोबरच फडणवीस यांच्यावरही निशाणा साधला गेला. भुजबळ यांच्याबाबतीत अजित पवार यांनी सुरुवातीला जरा खंबीर भूमिका घेत त्यांना मंत्रिमंडळातून बाहेर ठेवण्याचे धाडस दाखवले होते, त्यानंतर भुजबळ यांच्याकडून मोठा अकांडतांडव झाला. त्यांनी जवळपास अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात बंडाचे निशाण फडकवले असेच वातावरण होते, पण दरम्यानच्या काळात बीडचे प्रकरण उद्भवले आणि धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला. आता ती जागा रिकामी झाल्यानंतर, त्याजागी आपली वर्णी लागेल या हिशेबाने भुजबळ यांनी आपली बंडाची तलवार म्यान केली. पण तरीही त्यांना बराच काळ तिष्ठत राहावे लागले आहे. असो, पण आता विलंबाने का होईना भुजबळ पुन्हा मंत्री झाले आहेत. त्यांच्या वक्तृत्व शैलीला आता पुन्हा धार येईल आणि पुन्हा त्यांचे ओबीसी संघटन जोरात चालू होईल.

शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आता अजित पवार गट असा राजकीय प्रवास करून आलेल्या भुजबळ यांना आपली राजकीय भूमिका बदलणे तसे फारसे अवघड जात नाही. किंबहुना ते अत्यंत सफाईदारपणे आपल्याच बदलत्या राजकीय भूमिकेचे समर्थन करताना दिसतात. मिळालेल्या नव्या जबाबदारीनुसार त्यांना आता फडणवीस यांच्या नेतृत्वाची पालखी वाहायची आहे. अर्थात, ते कामही ते तितक्याच जोमाने करतील यात शंका नाही. त्यांच्या समावेशावर मराठा आंदोलकांकडून विपरीत प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली आहे. छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखालील मराठा समाजाच्या आंदोलनाला तगडा विरोध उभा केला होता. त्यामुळे मराठा आंदोलनाचे अनुयायी भुजबळ यांच्या समावेशाबद्दल अजित पवार आणि फडणवीस यांच्यावर नाराज होणे साहजिक आहे. छगन भुजबळ सध्या त्यांच्या राजकीय कारकिर्दीच्या उत्तरार्धातली खेळी पार पाडत आहेत. वास्तविक पाहता त्यांचे नेतृत्व बऱ्यापैकी वजनदार असतानाही त्यांनी केवळ एखाद्या मंत्रिपदासाठी आपल्या राजकीय कारकिर्दीत कमावलेली प्रतिष्ठा पणाला लावणे हे मात्र बहुदा त्यांच्या समर्थकांना अपेक्षित नसावे. भुजबळ यांना मिळालेल्या मंत्रिपदाचा प्रत्यक्ष ओबीसी समाजाला नेमका काय उपयोग होणार आहे हे येत्या काही काळात कळेलच. त्या दृष्टीने त्या समाजातील लोक भुजबळ यांना मिळालेल्या मंत्रिपदाकडे पाहात आहेत. भुजबळ यांना मंत्रिमंडळात घेतल्यानंतर अजित पवार यांनीही काही प्रमाणात सुस्कारा सोडला असावा, त्याचे कारण असे की मुंडे यांच्या जागी भुजबळ यांच्याऐवजी दुसऱ्याच कुठल्यातरी आमदाराला संधी दिली गेली असती, तर ती भुजबळ यांनी सहजपणे घेतली नसती आणि त्यांनी अजित पवार गटात बरीच धामधूम माजवली असती, त्यामुळे नाईलाजानेच अजित पवार यांना भुजबळांना मंत्री करावे लागले आहे, असाही एक प्रवाद आहे.

# परळी आगारात नव्या दहा लालपरी!

## अजय मुंडे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते नव्या बस प्रवाशांच्या सेवेत रुजू




**परळी वै । प्रतिनिधी**

**परळी वैद्यनाथ मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असल्याने येथील एसटी महामंडळाच्या आगारात नव्या दहा लाल परी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या असून या बसेसचे युवक नेते अजय मुंडे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते व महामंडळाच्या अधिकारी – कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पूजन करून लोकार्पण करण्यात आले.**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असलेल्या परळी आगारात ये - जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असल्याने येथे नवीन २० बसेसची मागणी धनंजय मुंडे यांनी केली होती. त्यापैकी महामंडळाच्या वतीने सध्या दहा नवीन बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत. या बसेसचे आज विधिवत पूजन करून लोकार्पण करण्यात आले, यावेळी अजय मुंडे यांच्या सह मान्यवर पदाधिकारी व नागरिकांनी नवीन बस मधून फेरफटका मारला. यावेळी अजयजी मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. विनोद जगतकर, बालाजी उर्फ पिंटू मुंडे, सुरेश टाक, के डी उपाडे, एजाज शेख, अनंत इंगळे, नितीन कुलकर्णी, शंकर कापसे, वसंत तिडके, संजय आघाव, सय्यद सिराज, दीपक तांदळे, रवी मुळे, अविनाश गवळी, सय्यद मुसा, रवी आघाव, महेंद्र रोडे, दत्ताभाऊ सावंत, गिरीश भोसले, गणेश सुरवसे, यांसह पदाधिकारी तसेच परळी आगाराचे अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

**सुतार समाजातील दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार गुण गौरव**

# जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करून सहभागी व्हावे-बापूराव भालेकर

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील सुतार समाजातील दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा बीड जिल्हा विश्वकर्मा जयंती उत्सव समितीच्या वतीने २६ मे २०२५ रोजी विश्वकर्मा मंदिर तळेगाव, बीड येथे गुण गौरव करण्यात येणार असून, यासाठी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिकेसह नाव नोंदणी करून सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा सुतार समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापूराव भालेकर यांनी केले आहे.**

विश्वकर्मा सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ च्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन केले जात आहे. यासाठी समाजातील दानशूर व्यक्तीचा मोठा सहभाग मिळत आहे. विश्वकर्मा जयंती उत्सव समितीच्या* प्रयत्नाने प्रत्येक महिन्याच्या अमावस्याला प्रभू विश्वकर्मा पूजन व महाप्रसादाचे आयोजन केले जाते . येत्या २६ मे २०२५ रोजी समाजातील उद्योगपती गंगाधरराव आगलावे यांच्या वतीने विश्वकर्मा पूजन व महाप्रसादाचे आयोजन केले आहे.याच दिवशी समाजातील दहावी आणि बारावी परीक्षा २०२५ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. गुणानुक्रमे इयत्ता दहावी व बारावी मधील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना उद्योगपती समाजभूषण गंगाधरराव आगलावे यांचे वतीने पारितोषिक देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक कै.राधाबाई दशरथ आगलावे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम ईयत्ता दहावी २५०१ रु. बारावी २५०१ रुपये, द्वितीय पारितोषिक कै.दशरथराव कृष्णाजी आगलावे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम ईयत्ता दहावी १५०१ रु. बारावी १५०१ रुपये, तृतीय पारितोषिक कै.किशोर गंगाधरराव आगलावे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम ईयत्ता दहावी ११०१ रु. बारावी ११०१ रुपये, तसेच ७५% पेक्षा जास्त गुणवत्ताधारक इयत्ता दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मानपत्र देऊन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रम दि. २६ मे २०२५ रोजी प्रभू विश्वकर्मा मंदिर, नगर रोड तळेगाव बीड. या ठिकाणी होणार आहे. बीड जिल्ह्यातील तमाम सुतार समाज बांधवांना आवाहन करण्यात येत आहे की, आपल्या मुलांच्या कौतुक सोहळ्यासाठी आपल्या मुलांचे गुणपत्रिका दि. २४ मे २०२५ पर्यंत अरुण कुंडलकरसर मोबा. नं. ९४२२७२०८९७, पंढरीनाथ क्षीरसागर सर मोबा. नंबर ८२०८४९५८६७, पांडुरंग उनवणेसर मो. नं. ७५८८०५६१९, राजु पांचाळ मो नं. ९७६५७६१४३६ यांच्याशी संपर्क करून गुणपत्रिकेसह नाव नोंदणी करावी असे आवाहन बीड जिल्हा सुतार समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापूराव भालेकर यांनी केले आहे.




**बीड–आधुनिक भारताचे शिल्पकार, संगणकयुग व दूरसंचार क्रांतीचे प्रणेते, देशाच्या विकासाला नवी दिशा देणारे भारताचे सर्वात तरूण माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गिय राजीवजी गांधी यांना स्मृतीदिना निमित्त अभिवादन करताना मातृभुमी प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष डॉ संजय तांदळे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे आदी मान्यवर उपस्थित होते.**

# सर्दी तर होणारच ना...!

**पावसाळा आला की पावसाळी छत्र्या येणारच असं मराठीत गंमतीने म्हटलं जातं आणि ते देखील खरच आहे. जंगली मशरूम अर्थात पावसाळी छत्री या आशयाने इथं अर्थ घेतला जात असतो. मात्र येणाऱ्या पावसासोबत ज्या काही गोष्टी समोर येतात त्यात पावसाळ्यात होणारे आजार अर्थात साथरोग देखील येऊ शकतात आणि साथरोगाची ही आपत्ती रोखली नाही तर मोठा गोंधळ निर्माण होतो.**

पावसात भिजल्यानंतर सर्दी होणे हे अगदी सहाजिक आहे. प्रत्येक वेळी आपण छत्री अथवा रेनकोट घेऊन फिरत नाही आणि अनेकदा वाहनाच्या डिक्कीतला रेनकोट परिधान करेपर्यंत आपण भिजलेलो असतो. लहान बालकांची प्रतिकारशक्ती तुलनेत कमी असली तरी त्यांना याचा धोका कमी आहे. मात्र तथापि दुसन्या बाजूस घरातून पालकांकडून याचा प्रसार होऊ शकतो. साधारणपणे सर्दी-पडसे हा पावसाळ्यातील सवयीचा आजार आहे आणि त्यावर मुख्यतः घरगुती इलाज होताना दिसतात. स्वतःहून औषधे घेणे आणि मुलांना देणे असे प्रकार प्रचलीत



आहेत. अनेकदा टि.व्ही. वरील जाहिराती बघुनही औषधे घेतली तसेच दिली जाताना दिसतात परंतु नेमकेपणाने निदान करून मगच औषधे घ्यावीत हे उत्तम. विविध प्रकारच्या औषधांचा स्वतःहून वापर करणे कुणासाठीही धोकादायकच म्हणावे लागेल कारण या औषधांचे चांगले परिणाम होवून आजारातून बरे होता येईल ही अपेक्षा असते. मात्र या प्रकारच्या औषधांचे दुष्परिणाम काय होतात याची माहिती नसल्याने त्याचा उलटा परिणाम होवू शकतो. आरोग्यासाठी हा धोका पत्करू नये. आपल्याकडे निष्काळजीपण, दुर्लक्ष करणे आणि दुखणे अंगावर काढणे असेही प्रकार दिसून येतात. यातूनही आजारपण वाढू शकते. त्यामुळे आजारी पडल्यावर न चुकता वैद्यकीय सल्ला घेणं केव्हाही उत्तम. आपले शरीर मुख्यत्वे पाण्यावर अवलंबून असते. आणि पावसाळ्यात जे आजार आढळून येतात त्यापैकी साधारण ७० टक्के, आजार हे पाण्यामुळे होतात. त्यात पाण्यातील जिवाणुंमुळे होणारे आजार वेगळे आणि विषाणुंमूळे होणारे आजार वेगळे आहेत. या सर्वांचे मुळ अर्थात पाणी हेच आहे. पावसाळ्यात अनेक विषाणू सक्रिय होतात. त्यामुळे शुद्ध पिण्याचे पाणी हा आजारांना दूर ठेवण्याचा सर्वोत्तम उपाय आहे. पावसाळ्यात अनेक ठिकाणी जलसाठे दुषित होतात. त्यामुळे आजारांचा धोका वाढत असतो. घरात पिण्याचे पाणी उकळून ते थंड करून घेणे चांगले. पाणी उकळल्याने त्यातील सर्व जिवाणू, विषाणू मरतात. त्यामुळे ज्या ठिकाणी शुद्ध पाणी नाही त्या ठिकाणी पाणी उकळूनच प्यावे. पाण्यातील अशुध्दपणा दूर करण्याचा आणखी एक उपाय म्हणजे तुरटीचा वापर करणे होय. बाजारात तुरटी सहजरित्या उपलब्ध असते. कोणत्याही किराणा दुकानात ती आपणास खरेदी करता येईल. पाण्यात तुरटी फिरविल्यास गाळ खाली बसेल नंतर त्याचा वापर करता येईल. पाण्यात तुरटी फिरवणे सर्वच अर्थाने आपल्या आरोग्यासाठी सहाय्यकारी ठरणार आहे. तुरटीच्या पाण्याने अंघोळ केल्यास त्वचेवर होणारा संसर्ग कमी होतो. हे पाणी त्वचेतील मृतपेशी काढून टाकण्यास मदत करते. जखम लवकर भरणे आणि संसर्ग कमी करणे या दोन्हींमध्ये तुरटी लाभदायक आहे. आला पावसाळा म्हणजे आरोग्य सांभाळा असाच संदेश मानून पावसात भिजण्याचा आनंद घ्यायला देखील हरकत नाही.

**प्रशांत विजया अनंत दैठणकर**
**(जिल्हा माहिती अधिकारी)**

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांसाठी साथी,

खतांच्या लिंकिंगबाबतील कडक निर्णय घेतला जाणार असल्याचा दावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. ते म्हणाले, ''प्रत्येक खत विक्री दुकानासमोर खताचा बोर्ड लावला जाणार आहे. खतासाठी अनुदान दिले जाते. त्यामुळे कंपन्यांनी लिंकिंग केल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. तसेच कीड व्यवस्थापन अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळे शेतातील नव्या पद्धतींवर आणि कीड व्यवस्थापानावर मार्गदर्शन मिळणार आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

------------

### बीडच्या प्राथमीक अन् माध्यमीक

त्यांच्यावर कारवाई होणार आहे. एवढेच नाहीतर या काळात नोकरीस लागलेले बोगस शिक्षक आणि कर्मचारी यांची देखील चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई होईल. यात जे जे दोषी आढळतील त्यांच्यावर गुन्हे दाखल होतील. दरम्यान, बीड जिल्ह्यात आणि विशेष करून शैक्षणिक क्षेत्रात यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

-----------

### कैलास मानसरोवर

आणि चीनमधील सीमा तणाव आणि कोरोना साथीमुळे हा प्रवास थांबवण्यात आला होता. कैलास मानसरोवर यात्रेसाठी निवडलेल्या भाविकांना एसएमएस आणि ईमेलद्वारे माहिती देण्यात आली. भाविक यात्रेच्या वेबसाइटवर किंवा ०११-२३०८८१३३ या हेल्पलाइन क्रमांकावर देखील त्यांची निवड स्थिती तपासू शकतात. यासाठी ५५६१ लोकांनी नोंदणी केली होती. प्रत्येक बॅचमध्ये २ एलओसह एकूण ७५० निवडक यात्रेकरू कैलास मानसरोवरला जातील.

-----------

### पशूसंवर्धन विभाग अधिक सक्षम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली. विभागातील रिक्त पदांमुळे नागरिकांना विशेषतः पशुपालक, शेतकरी यांना सेवा देण्यास येणारी अडचण लक्षात घेऊन विभागातील आवश्यक पदे भरण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी त्यांनी पशुसंवर्धन सेवा गट अ मधील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र सादर केले. त्यानंतर आता प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करून महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट अ या संवर्गातील सहायक आयुक्त, पशुसंवर्धन ही ३११ पदे भरण्याचा निर्णय घेतला आणि तसे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवले. या भरतीची प्रक्रिया वेगाने होण्यासाठी श्रीमती मुंडे यांनी पाठपुरावा केला. एम पी एस सी ने सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन या संवर्गातील ३११ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली असून २० जून २०२५ पर्यंत अर्ज मागविले आहेत.

**कामास येणार गती**

ही भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून पशुसंवर्धन विभागाला सक्षम आणि नवीन अभ्यासू अधिकारी मिळणार आहेत. त्यातून ग्रामीण भागातील पशुसंवर्धन विभागाचे काम आणखी वेगाने व पूर्ण क्षमतेने होण्यास मदत होणार असून पशुपालकांना चांगल्या दर्जाची सेवा मिळणार असल्याचे मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले.

------------

### पंधरा हजारांचा ड्रोन पाडण्यासाठी

आपले किती नुकसान झाले आहे, आपली किती जीवितहानी झाली आहे, आपल्या किती सैनिकांचे नुकसान झाले आहे. आपल्या किती राफेलचे नुकसान झाले आहे, याची माहिती मिळाली पाहिजे, असे वडेट्टीवार म्हणाले. पाकिस्तानने चीनमध्ये तयार झालेले ड्रोन पाठवले. त्या ड्रोनची किंमत १५ हजार रुपये आहे. त्याने काही होत नाही. ते एक ड्रोन पाडण्यासाठी आपण १५ लाखांचे क्षेपणास्त्र डागले. हे ड्रोन पाठवण्यामागे चीनचे खास धोरण होते, असे म्हणतात. त्यामागे सत्य काय आहे हे मला माहिती नाही. मात्र असे पाच सहा हजार चायनिज ड्रोन भारताच्या दिशेने पाठवले गेले. त्यांना पाडण्यासाठी आपण १५ लाखांचे क्षेपणास्त्र वापरले. त्याशिवाय आपली तीन की चार राफेल विमाने पाकिस्तानने पाडली, अशी चर्चा आहे, असा दावाही वडेट्टीवार यांनी केला. दरम्यान, सरकारने या मोहिमेदरम्यान काय निर्णय घेतले? किती खर्च केला आणि त्याचे काय परिणाम झाले, हे जाणून घेण्याचा जनतेला अधिकार आहे. त्यामुळे सरकारने याबाबत स्पष्ट उत्तर द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

-----------

### मराठवाड्यात अवकाळीचा

प्रत्येकी ५ जण दगावले आहेत. यंदा मराठवाड्यात वीज कोसळून होणाऱ्या मृत्यूंमध्ये वाढ झाली आहे. दरम्यान, गतवर्षी राज्यात एकूण ७६ मृत्यूंची नोंद झाली होती.

-------------

### राज्यातील जमिनींची हिस्सेवाटप मोजणी आता

करण्यासाठी मोजणी आवश्यक असते. बऱ्याच वेळा जमिनीच्या सीमांवरून वाद निर्माण होतात, त्यामुळे या मोजणीला प्राधान्य दिलं जातं. शिवाय जमिनीच्या खरेदी विक्रीसाठी व न्यायालयीन प्रकरणांसाठी सरकारचा जमीन मोजणीचा अहवाल महत्त्वाचा ठरतो. केवळ २०० रुपये मोजणी शुल्क भरून एकत्र कुटुंबाच्या जमिनीचे नोंदणीकृत वाटणीपत्र व नकाशे देण्याचा अतिशय महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांवर आर्थिक भार पडू नये, हा यामागील उद्देश आहे. हिस्सेमोजणीला एक हजार ते चार हजार रुपये प्रति हिस्सा असे शुल्क आधी आकारण्यात येत होते. ते आता अवघ्या २०० रुपयांवर केल्याने शेतकऱ्यांचा जमीन मोजणीचा मोठा खर्च वाचणार आहे.

---------

### दीड कोटींचे बक्षीस असलेला

मृतदेह आणि शस्त्रे पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील बिनागुंडा गावापासून २५ ते ३० किलोमीटर अंतरावर अबुझमाडचे जंगल सुरु होते. या जंगलात नक्षल्यांचे मोठे नेते एकत्र आल्याची माहिती मिळाल्यानंतर नारायणपूर, दंतेवाडा, बिजापूर आणि कोंडागाव येथील पोलिसांच्या डीआरजी चमूच्या जवानांनी अबुझमाडच्या जंगलात नक्षलविरोधी अभियान राबविण्यास प्रारंभ केला. सकाळी डीआरजी जवानांशी झालेल्या चकमकीत नंबाला केशव राव उर्फ बसव राजू ठार झाला. या चकमकीत एक जवानही शहीद झाला आहे. दरम्यान, छत्तीसगड पोलिसांनी सर्वोच्च नक्षली नेता नंबाला केशव राव उर्फ गगन्ना याच्यासह २७ नक्षल्यांना कंठस्नान घातल्याच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ट्विटरवरुन छत्तीसगड पोलिसांच्या शौर्याचे कौतुक केले आहे. आजचा दिवस हा नक्षलवाद निर्मुलनाच्या लढाईतील मैलाचा दगड ठरणारा आहे. देशाच्या नक्षलवादाविरुद्धच्या लढाईतील मागील ३० वर्षांत पोलिसांनी माओवाद्यांच्या राष्ट्रीय महासचिवास कंठस्नान घालण्याची ही पहिलीच वेळ आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत मोदी सरकारने नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्याचा संकल्प सोडल्याचा पुनरुच्चार अमित शहा यांनी केला.

-------------

### ना.छगन भुजबळ साहेब यांच्या निवडीचा

गणेश जगताप, सोनार समाजाचे नेते ॲड. संदीप बेदरे, माळी महासंघाचे ज्येष्ठ नेते प्रा. लक्ष्मणराव गुंजाळ, भाजपाच्या नेत्या संजीवनीताई राऊत, माजलगावचे समता परिषदेचे नेते संतोष रासवे, मोहनराव गोरे, संतराम पानखडे, दिनकर जमदाडे, बाबासाहेब दुधाळ, विठ्ठल भराटे, अशोक भानुसे, बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये, नारायणराव शिंदे, समता परिषदेचे युवा नेते संदीप दुधाळ, अजय राऊत, सार्वजनिक जयंती महोत्सवाचे माजी अध्यक्ष तुषार दोडके, समीर राऊत, महादेव आढाव, मच्छिंद्र आढाव, दत्ता लव्हाळे, जगन खेत्रे, अशोक रासवे, महेश व्यवहारे, स्वप्निल शिंदे, महेश चौधरी, गोटू साखरे, अमोल राऊत, ह. भ. प. खरमाटे महाराज, रवी काळे यांच्यासह मोठ्या संख्येने ओबीसी समाज बांधव उपस्थित होते.

-------------

cmyk

## चुंबळी येथील बेकायदेशीर बिले देवू नयेत; बिडीओना निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

चुंबळी ग्रामपंचायत अंतर्गत जन सुविधा योजनेअंतर्गत बोगस व बेकायदेशीर कामाचे बिल देऊ नये अशा प्रकारचे निवेदन गटविकास अधिकारी पंचायत समिती पाटोदा यांना देण्यात आले आहे ... याबाबत अधिक माहिती अशी की चुंबळी ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या जन सुविधा योजनेअंतर्गत कामे निकृष्ट झाले आहेत व ते बेकायदेशीर रित्या केलेली आहेत ग्रामपंचायत सदस्य यांची सभेमध्ये रक्कम खर्च करणे व सुरू करण्यासाठी कसलीही मान्यता घेण्यात आली नाही कामाचे प्रत्येक टप्प्यावरील फोटो अपलोड केले नाहीत किंवा काढले नाहीत मोजमाप पुस्तिकाही मान्यता प्राप्त नाही टेंडर हे ग्रामपंचायत सदस्य यांना न विचारता बोगस केली आहेत तसेच त्याची गुणवत्ता तपासणीचे प्रमाणपत्र ही जोडलेले नसून बोगस दाखवत आहेत तरी कधीच कोणत्याही प्रकारची कामे झाले असून तरी फक्त हुकूमशाही पद्धतीने ही बोगस बिले दिल्यास त्यास पंचायत समिती व लेखा विभाग बांधकाम विभाग हे जबाबदार राहतील व त्यानंतर होणाऱ्या परिणामाची जबाबदारी पंचायत समितीवर राहील असे गटविकास अधिकारी पंचायत समिती पाटोदा व लेखा अधिकारी पंचायत समिती पाटोदा यांना दिलेल्या निवेदनामध्ये. सौ. गीतांजली भरत नागरगोजे उपसरपंच आजिनाथ लक्ष्मण नागरगोजे. ग्रामपंचायत सदस्य अण्णासाहेब गोंदकर ..कुसुम दिनकर नागरगोजे. सतीश पवळ.. स्वाती दत्तु पवळ यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. २२ मे २०२५



# अंबाजोगाईतील रोड मोठे पण रस्ते लहान याला जबाबदार कोण?

## शहरातील वाहतूक नियमाचे वाजले बारा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाईत आती दोन चाकी,तीन चाकी, चार चाकी वाहणाच्या पार्किंग विनाकारण अडथळा, बे जबाबदार पणा मुळे रस्त्यावर पादचाऱ्याला रस्त्यावर चालणं मुश्किल झाले सविस्तर वृत्तांत पुढील प्रमाणे अंबाजोगाई शहराच्या विकासासाठी शहरात मागील दोन, तीन वर्षात बऱ्याच वेळी आतिक्रमने काढण्यात आली त्यामुळे रस्ता चे रुंदीकरण करण्यात आले त्यामुळे रोड मोठे झाले पण त्यावर अडचण निर्माण करणाऱ्यांची गर्दी वाढली यांत हॉटेल व्यवसाइक, फळ विक्रते, ऑटो चालक मोटर सायकल चालक यांनी राज रोष वेडी वाकडी बिनधास्त लावून जातात आपल्या मुळे इतरांना अडचण होणार याचे त्यांना भान नाही शहरातील फक्त रोड मोठे झाले याची प्रचिती बऱ्याच नागरिकांना महिलांना शाळा कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलींना / विद्यार्थी ना प्रत्यक्षात आली आहे.**

याला आळा बसावा यासाठी नगरपालिका, पोलीस प्रशासन, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी पुढाकार घेतला पाहिजे यासाठी अंबाजोगाईतील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन व शहर पोलीस स्टेशन वाहतूक विभाग यांना एक पत्र काढून आपल्या सोबत मदतनीस म्हणून घेऊन रस्ता सुरक्षा सप्ताह सारखा एक सामाजिक उपक्रम राबवावा अंबाजोगाई शहरातील गर्दीच्या ठिकाणी




स्वतः परिवहन अधिकारी नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकाला कायदेशीर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी त्याशिवाय शहरातील वाहतुकीला आळा बसणार नाही असे मत नियमात चालणाऱ्या मोजक्या नागरिकांची आहे नगरपालिकेतील अधिकाऱ्यांचे काम फक्त अतिक्रमण काढणे नव्हे तर पुन्हा रस्त्यावर अतिक्रमण बसणार नाही याची खबरदारी घेणे ही पण असते त्या कर्तव्यापासून दूर पळताना बरेचसे नगरपालिकेतील कर्मचारी अधिकारी दिसतात हे तितकच खरं जितकी गर्दी मंदिराच्या समोर बस स्टँडच्या समोर असते त्याच्यापेक्षा जास्त गर्दी नगरपालिकेच्या कार्यालयाच्या आवारामध्ये असते हे त्याच जिवन्त उदाहरण प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस प्रशासन यांनी ही कारवाई हाती घेतल्या नंतर शहरातील नेते सामाजिक कार्यकर्ते वेगवेगळ्या शाखेचे पदाधिकारी यांनी त्यांच्या कर्तव्यात बाधा हस्तक्षेप आणू नये असं केल्यास अंबाजोगाई शहरातील वाहतुकीची समस्या नक्कीच सुधारेल, व यात काही दुमत नाही मगच अंबाजोगाईतील रोड बरोबर रस्ते ही मोठे होतील सर्व साधारण जनतेला चालताना मोकळा स्वास घेता येईल.

## सोमेश्वरमध्ये तालुकास्तरीय मदतकक्ष सुरु



अंबाजोगाई । प्रतिनिधी

घाटनांदूर येथिल सोमेश्वर ज्युनियर कॉलेजमध्ये अकरावी ऑनलाईन प्रवेशासाठी मोफत मार्गदर्शन व मदत मिळावी म्हणुन तालुकास्तरीय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्षे २०२५-२६ पासुन अकरावी विज्ञान, कला व वाणिज्य शाखेचे प्रवेश ऑनलाईन होणार आहेत. विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुलभ व्हावी, यासाठी नोडल अधिकारी तथा केंद्रप्रमुख श्री ए.पी.कोपले सर यांच्या उपस्थितीत सोमेश्वर ज्युनियर कॉलेज, घाटनांदूर येथे तालूकास्तरीय अकरावी ऑनलाईन विद्यार्थी मदत व मार्गदर्शन केंद्राचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पर्यवेक्षक कृष्णा देशमुख सर, आर.एस.देशमुख सर, जे.पी.खरात सर व व.लि.बी.एम.कोकणे सर आदी उपस्थित होते. ऑनलाईन प्रवेशासाठी साईट, टप्पे, कागदपत्रे व पसंतीक्रमाची माहिती भरण्यासाठी विद्यार्थी मदत केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन कोपले सरांनी केले आहे.

## प्रा.डॉ.शाहिस्ता इनामदार यांची प्राचार्यपदी नियुक्ती



बीड । प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयाच्या पूर्णवेळ प्राचार्यपदी प्रा. डॉ. शाहिस्ता सलीमखान इनामदार यांची नियुक्ती झाली. त्या या महाविद्यालयाच्या पहिल्या महिला प्राचार्य ठरल्या. त्यांनी १७ मे रोजी पदभार स्वीकारला. डॉ. इनामदार - यांनी यापूर्वी नवजीवन विधी महाविद्यालय, नाशिक येथे दोन वर्षे प्रभारी प्राचार्य म्हणून काम पाहिले.

पंधरा वर्षे त्यांनी सहयोगी प्राध्यापक म्हणूनही काम केले. फॅमिली लॉ या विषयात त्यांनी पीएच.डी केली आहे. त्या पीएच.डी गाईड आहेत. या नियुक्तीबद्दल मा. ॲड. आदर्श अरुणराव जाधव राज्य सचिव (लीगल सेल) महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना, ॲड. सुमित पांडे, ॲड. दिनेश जाधव , प्रा. हराळे सर, गणेश जोगदंड, प्रा. नवनाथ सर व इतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## राजमाता अहिल्यादेवी त्रिशताब्दी जयंती-निमित्त पापनाश मंदिरात स्वच्छता अभियान

**बीड । प्रतिनिधी**

**राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या आजोळ असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील चोराखळी येथील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या आणि अहिल्यादेवींनी स्वत: स्थापन केलेल्या श्री पापनाश मंदिर परिसरात भाजपच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले.**

या उपक्रमात भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, ॲड. नितीन भोसले, खंडेराव चौरे, विकास बारकुल, इंद्रजित देवकते, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, डॉ. गोविंद कोकाटे, मदन बारकुल, दत्तात्रय सोनटक्के, मकरंद पाटील, शिवाजी गिड्डे, खंडेराव मैंदाड, सोमनाथ बारकुल हे भाजपचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी यावेळी सांगितले की, ''अहिल्यादेवी होळकर यांनी केवळ मंदिर बांधणीच नव्हे तर समाजकारणातही व्यापक योगदान दिले. चोराखळीतील पापनाश मंदिर आजही त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाचा साक्षीदार आहे. त्यांच्या



त्रिशताब्दी वर्षात या मंदिराचा सन्मान आणि परिसराची स्वच्छता राखणे हे आपले कर्तव्य आहे. या अभियानाच्या माध्यमातून संस्कार, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

# डोनेशन घेणाऱ्या शाळेवर कारवाई करा

## अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई तालुक्यात शिक्षण संस्थेअंतर्गत होणारी प्रवेश प्रक्रिया ही गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या अधिपत्याखाली पूर्ण करून डोनेशन घेणाऱ्या शाळेवर तात्काळ कठोर कारवाई करा अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी केली आहे. याबाबत अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे वतीने अंबाजोगाई येथील अप्पर जिल्हाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांना सोमवार, दिनांक १९ मे रोजी निवेदन देण्यात आले आहे.**

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर (बाबा) यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनानुसार सोमवार रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अंबाजोगाई तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व



खाजगी शाळेतून प्रवेशासाठी बऱ्याच शाळेतून पैशांची मागणी केली जाते व पैसे आकारणी केल्याशिवाय विद्यार्थ्यांना त्या संबंधित शाळेतून प्रवेश दिला जात नाही. तसेच प्रवेशावेळी डोनेशन म्हणून घेतलेल्या त्या पैशांची अधिकृत पावती ही दिली जात नाही. यामुळे पालकांची मोठी कुचंबना होत आहे. शिवाय कामात दिरंगाई पण केली जाते. आपल्या आदेशानुसार प्रत्येक शाळेमध्ये नोटीस बोर्डावर येथे डोनेशन घेतले जात नाही असे दर्शनी भागावर ठळकपणे नोटीस लिहिण्यात यावी अशी विनंती ही निवेदनातून केली आहे. वास्तविक प्राथमिक शिक्षण कायदा २००९ नुसार कोणत्याही शाळेला कुठली ही फीस आकारता येत नाही, तरी ही अनाधिकृत फी (डोनेशन) वसूल करण्याची पद्धत शासन नियमानूसार सर्व इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या शाळांमधून बंद करावी व अशा शाळांची सखोल चौकशी करण्यासाठी गटशिक्षण अधिकारी यांनी एक समिती निवडावी व विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय द्यावा साहेबांनी या प्रकरणी लक्ष देऊन या समस्या सोडवाव्यात अशी सहकार्याची अपेक्षा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी गटशिक्षण अधिकारी, गटशिक्षण कार्यालय अंबाजोगाई तसेच प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांना माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. या निवेदनावर अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख रणजित डांगे, हिंदूलाल आबा काकडे, बा.ह.शेरेकर, माऊली वैद्य, प्रशांत आदनाक, नानासाहेब धुमाळ, ओमकार चव्हाण, धनंजय सुरवसे, नानासाहेब गायकवाड, विजयानंद सोळंके, लहुजी शिंदे, शेख अकबर, दयानंद गुजर, सचिन राऊत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पाटोदा डेपो मॅनेजर तिडके यांच्याकडून सहा वाहकावर अन्याय

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील एसटी महामंडळातील खाते अंतर्गत आठ लोकांचे प्रमोशन होऊन क्लर्क या पदावर प्रमोशन झाले असून. त्यापैकी मर्जीतल्या दोन कर्मचाऱ्यांना डेपो मॅनेजर यांनी कार्यमुक्त केले असून.दोन वाहकांना फक्त पाटोदा डेपो मध्ये क्लर्क या पदावर पोस्टिंग दिली आहे. तर सहावाहकावर अन्याय केला असून . इतर सहा कर्मचारी न्यायाच्या प्रतीक्षेत असून. डेपो मॅनेजर तिडके यांच्याकडून लवकरच सहा वाहकांना सहकार्याची अपेक्षा असून. त्यांच्यावर झालेल्या अन्याय हा दूर लवकर व्हावा अशी त्यांची. मागणी असून. मॅनेजर यांनी त्यांच्यावर अन्याय लवकरात दूर करावा अशी भावना व्यक्त आपल्या प्रतिनिधीशी व्यक्त केली.

पान ६ वरून...

### विनयभंग केल्याचे आरोपातून

यांच्या साक्ष पुराव्यानुसार आरोपी दत्ता बाबासाहेब तोंडे व फिर्यादीचे भाऊ यांनी सिद्धनाथ सहकारी साखर कारखाना येथे ऊस तोडणी मुकादम म्हणून काम केलेले असून फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ यांच्याकडे राहिलेल्या बाकी मुळे फिर्यादीने आरोपीचे विरुद्ध फिर्याद दिलेली असल्याचा एक्टिवात आरोपीचे वतीने ॲड. जे बी बडे यांनी केलेला होता. सदर प्रकरणात सन्माननीय न्यायालयात झालेल्या साक्षी पुराव्यांती ॲड. जे बी बडे यांच्या युक्तिवाद ग्राह्य धरून माननीय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी श्री एन. एम.वाली साहेब यांनी आरोपी दत्ता बाबासाहेब तोंडे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणात ॲड. जे बी बडे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी दत्ता बाबासाहेब तोंडे राहणार साळेगाव तालुका केज जिल्हा बीड यांची निर्दोष मुक्तता करण्यात आलेली आहे आरोपी दत्ता बाबासाहेब तोंडे यांच्यावतीने ॲड. जे.बी.बडे धारूर यांनी युक्तिवाद केला त्यांना ॲड. एन.बी.पांचाळ ॲड.एम.बी.भोसले यांनी सहकार्य केले.

### काँग्रेसच्या वतीने

सुरुवात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हाधिकारी कार्यालय समोरून जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्यालयात शहीद जवानाच्या प्रति संवेदना व केलेल्या शौर्याला सलाम व्यक्त करत या रॅलीचा समारोप करण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रवीणकुमार शेप, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेदरे, परवेज कुरेशी, संभाजी जाधव, गणेश राउत, विष्णू मस्के, प्रकाश मुंडे, पांडुरंग मस्के, दादासाहेब तासतोडे, राहुल जाधव, ॲड. विशाल मस्के, रमधन जमाले, मोसिन शेख, गणेश जवकर, कल्याण टेकाळे, हनुमंत घोडके, शेख कादर बाबा, उत्तरेश्वर जाधव, बबलू भाई शेख, रोहित नवले, राम शेळके, हरिभाऊ सावंत, पांडुरंग हराळे, सखाराम बेंडगे, रंजीत शेळके, अमजत कुरेश, शेख मुस्ताक, बाळू गिराम यांच्यासह या रॅलीत बीड शहर मंचचे नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, डॉ. संजय तांदळे, अड. नितीन वाघमारे यांनी देखील उपस्थित राहून भारतीय सैनिकांप्रती आपल्या संवेदना दर्शवल्या.

### अंशतः अनुदानित

तयार झाले आहे. ना. अजित पवार यांना निवेदन देताना महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष श्री. जितेंद्र डोंगरे सर, बीड जिल्हाध्यक्ष श्री.आत्माराम वाव्हळ सर, श्री.शिवप्रसाद शिरसाट सर, श्री. संजय देवा कुलकर्णी आदी बहुसंख्येने शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### मंजरथ येथील घाटाची

मोठी अस्वच्छता निर्माण झाली होती. त्यामुळे अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधुन गोदाघाटाची स्वच्छता करण्यात आली तसेच गंगा आरती देखील करण्यात आली. यावेळी गावातील महिला, पुरूष व भाजपा कार्यकर्त्यांसह शंभरपेक्षा अधिक भाविकांची आरतीला उपस्थिती होती.

# अठरा वर्षानंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांची भरली शाळा

## सिंदखेडच्या रामेश्वर विद्यालयात २००६-०७ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

**आजच्या धावपळीच्या जीवनात आनंद कुठे शोधायचा असा प्रश्न प्रत्येकाच्या मनात येत असतो. स्वार्थीपणाच्या दुनियेत दोस्ती हे एकमेव नाते निव्वळ आणि निर्मळ स्वच्छ पाण्यासारखे असते. तोच धागा विणण्याचा अनुभव सिंदखेड येथील रामेश्वर विद्यालयाच्या २००६ - ०७ च्या बॅचच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी घेतला. तब्बल १८ वर्षानंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणी ताज्या करत एक दिवसाची शाळा भरवून त्या काळातील विद्यार्थ्यांची भूमिका घेतली होती.**

परमपुज्य गुरु गणपत बाबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित रामेश्वर विद्यालय सिंदखेड मध्ये शैक्षणिक वर्ष -२००६ -०७ मध्ये इयत्ता दहावी च्या वर्गात शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी यांच्या संकल्पनेने विद्यालयात एक दिवसाची शाळा भरवून माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न झाला. सर्वप्रथम सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच ग्रामीण भागातील शेतकरी व गोरगरीबांच्या मुलांना शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थेची स्थापना करणारे कै.रामदास (भाऊ) दगडुजी करांडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तर यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



विद्यालयाचे सचिव/ मुख्याध्यापक संभाजीदादा करांडे उपस्थित होते. यावेळी सर्व गुरुजनांचा सत्कार संपन्न झाला शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी शिकवलेले धडे, दिलेला अभ्यास, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन आणि त्यातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करुन जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी मुख्याध्यापक संभाजी करांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्नेह मेळाव्यास उपस्थित सर्वांसाठी स्नेह भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेस भेट वस्तू देण्यात आली. यावेळी जेष्ठ शिक्षक गोवर्धन बांगर , जोगदंड सर , आजबे सर , शेरकर सर , हर्षे सर , पंडित सर , लिंमकर सर , वखरे मामा यांच्यासह आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे माजी विद्यार्थी ह.भ.प किर्तनकार चंद्रशेखर वारे यांनी तर आभार गोवर्धन बांगर यांनी व्यक्त करुन राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### विद्यार्थ्यांनी ताज्या केल्या बालपणीच्या आठवणी

त्याकाळी विद्यार्थी दशेत कोणालाही काहीच समजलें नसेल, पण आज १८ वर्षानंतर जमलेल्या विद्यार्थांना २००६-०७ च्या काळात गेल्याची अनुभूती आली. इतक्या काळानंतर एकत्र आलेल्या मित्र - मैत्रिणींचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. सर्वांनी एकमेकाचे स्नेह वृद्धिंगत केले. शाळेच्या निमित्ताने का होईना इतक्या वर्षांची विचारपूस करण्याची जणू नामी संधी उपलब्ध झाली होती. त्याचे सोने करत सर्वांनी खूप आनंद घेतला.- अशोक जाधव, (ग्रा.पं. सदस्य चिखली)

cmyk

# हवामानाची पूर्ण माहिती देणारे सचेत ॲप ठरतेय फायद्याचे


## पंतप्रधान मोदी यांनीही केली शिफारस

दिल्ली : 'मन की बात'मध्ये पंतप्रधानांनी अनेक महत्त्वाच्या गोष्टींवर भाष्य केलं. त्यापैकी एक म्हणजे सचेत ॲप. प्रत्येक स्मार्टफोन वापरकर्त्याने हे ॲप आपल्या फोनमध्ये असायलाच हवं, असं पंतप्रधानांनी ठामपणे सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'च्या १२१ व्या भागात देशातील सर्व नागरिकांना सचेत ॲप डाउनलोड करायचं आवाहन केलं. हे ॲप १२ भाषांमध्ये उपलब्ध आहे.सचेत ॲपची निर्मिती राष्ट्रीय आपदा व्यवस्थापन प्राधिकरणाने (एनडीएमए) केली आहे. हे ॲप खास प्राकृतिक आपत्तींपासून बचाव करण्यासाठी बनवलं आहे. देशात कुठेही आपत्ती येण्याची शक्यता दिसली, तर हे ॲप तिथल्या लोकांना तातडीने माहिती देतं. मग ती माहिती वेगवेगळ्या भाषांमध्ये असते. भारी पाऊस, चक्रीवादळ, पूर किंवा भूकंप अशा कुठल्याही आपत्तीची चेतावणी हे ॲप लगेच देतं. त्यामुळे लोकांना सावध राहायला वेळ मिळतो. सचेत ॲप ॲपल आणि ॲन्ड्रॉइड दोन्ही फोनसाठी आहे. ॲन्ड्रॉइड वापरकर्ते गुगल प्ले स्टोअरवरून हे ॲप डाउनलोड करू शकतात.



ॲपल फोन वापरणारे ॲपल ॲप स्टोअरवरून ते मिळवू शकतात. डाउनलोड करणं खूप सोपं आहे.

सचेत ॲप कसं काम करतं?





हे ॲप तुमच्या फोनच्या जीपीएस लोकेशनचा वापर करतं. तुम्ही जिथे आहात, तिथलं हवामान, वाऱ्याचा वेग, पाऊस, तापमान याचा सतत मागोवा घेतं. जर तुमच्या भागात कुठली आपत्ती येण्याचा धोका दिसला, तर हे ॲप तुम्हाला लगेच नोटिफिकेशन पाठवतं. या नोटिफिकेशनमुळे तुम्हाला सावध राहायला वेळ मिळतो. विशेष म्हणजे, ही सगळी माहिती सरकारी यंत्रणांकडूनच येते. त्यामुळे ती पूर्णपणे खरी आणि विश्वासार्ह असते.

आपत्तीपासून वाचण्यासाठी टिप्स : सचेत ॲप फक्त चेतावणीच देत नाही, तर आपत्ती आली तर काय करावं, याबद्दल मार्गदर्शनही करतं. आपत्ती येण्यापूर्वी, ती आल्यानंतर आणि ती गेल्यानंतर काय करायचं, याच्या सोप्या टिप्स या ॲपमध्ये आहेत. मग ती आपत्ती भूकंप असो, पूर असो, चक्रीवादळ असो किंवा उष्णतेची लाट. या टिप्समुळे जीव वाचवणं शक्य होतं.

'हे' ॲप किती भाषांमध्ये आहे उपलब्ध?

देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावं, यासाठी सचेत ॲप १२ भाषांमध्ये उपलब्ध आहे. हिंदी, इंग्रजीसह अनेक प्रादेशिक भाषांचा समावेश आहे. त्यामुळे भारताच्या वेगवेगळ्या भागातील लोकांना ही माहिती त्यांच्या भाषेत मिळते. ही सुविधा खूप महत्त्वाची आहे.

## तमालपत्राची लागवड करा अन् मिळवा भरपूर नफा



शेतकरी शेतीत अनेक वेगेवेगळी पिके घेऊन नफा कमवायचा प्रयत्न करत असतात. यामध्ये कधी शेतकऱ्यांना नफा मिळतो तर कधी तोटा देखील सहन करावा लागतो. आपण ज्या पिकाबद्दल बोलत आहोत ते तमालपत्र आहे. तमालपत्र प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात आढळते. काही ठिकाणी याचा वापर मसाला म्हणून केला जातो तर काही ठिकाणी याचा वापर डेकोरेशनमध्ये केला जातो. भारतासह संपूर्ण जगामध्ये या पानाची मागणी वर्षभर असते. त्यामुळे या पानाची शेती केल्यास चांगला नफा मिळतो. त्यामुळे तुम्ही जर तमालपत्राची लागवड वेळेवर केली तर सामान्य पारंपरिक पिकांपेक्षा यामधून जास्त नफा मिळेल. तमालपत्रांची लागवड अनेकदा खडकाळ जमिनीवर केली जाते. त्यामुळे जर तुमच्याकडे खडकाळ जमीन असेल तर तुम्ही देखील याची लागवड करू शकता. त्याच्या लागवडीसाठी, मातीचे पीएच मूल्य ६ ते ८ दरम्यान असले पाहिजे, त्याचबरोबर त्याच्या झाडांमधील योग्य अंतराची देखील काळजी घेणे गरजेचे आहे. याची लागवड जून ते जुलै दरम्यान केली जाते.

तमालपत्राची लागवड कुठे होते?

भारतामधे सध्या उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक आणि केरळ त्याचबरोबर ईशान्य भारतातील डोंगराळ भागात याची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. परदेशात देखील याची लागवड केली जाते. इटली, रशिया, फ्रान्स, बेल्जियम त्याचबरोबर अमेरिकेच्या काही भागामध्येही याची लागवड केली जाते. याची लागवड करून शेतकऱ्यांनी शेतीत नवा प्रयोग करण्याची गरज आहे. तमालपत्राची शेती कशी सुरु कराल? : आपण तमालपत्राची लागवड सहजपणे सुरू करू शकता. ही शेती करण्यासाठी तुम्हाला सुरुवातीच्या टप्प्यात थोडी मेहनत करावी लागेल. जसजसे झाडे वाढतात तसतसे तुमच्या उत्पन्नात वाढ होत जाईल. राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाकडून तमालपत्राची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ३० टक्के अनुदान दिले जाते.किती उत्पन्न मिळणार?नफ्याबद्दल बोलायचे झाले तर एका तमालपत्राच्या रोपातून तुम्ही वर्षाला ५ हजार रुपये कमवू शकता. दुसरीकडे, जर तुम्ही वर्षाला २५ तमालपत्राची झाडे लावली तर तुम्हाला ७५ हजार ते १ लाख २५ हजार वार्षिक उत्पन्न मिळू शकते.

## जनावरांच्या आहारात बदल केल्यास दूध उत्पादन वाढणार

शेतकऱ्यांचा जोडधंदा म्हणून दूध व्यवसायाकडे पाहिले जाते. तसंच बहुतांश शेतकऱ्यांचा आर्थिक उदारनिर्वाह हा दूध व्यवसायावर अवलंबून असतो. यामुळे शेतकरी पशुची उत्तम काळजी घेतात. तसेच जनावरांचे दूध उत्पादन हे त्यांच्या आहारावर अवलंबून असल्याने खासकरुन शेतकरी त्याकडे जास्त लक्ष देतात. जनावरांना चांगला संतुलित आहार, हिरवा चारा, तेलाची पोळी आणि अन्य आहार दिल्यास जनावरांमधील दूध उत्पादन वाढते. यासोबतच त्यांची प्रतिकारशक्तीही मजबूत असते. यासाठी संतुलित आहाराचा मुद्दा होता. यासोबतच कृषी तज्ज्ञ चांगल्या दर्जाच्या दूध उत्पादनासाठी जनावरांच्या आरोग्यासाठी मोहरीचे तेल देण्याची शिफारस करतात.



जनावरांना मोहरीचे तेल देण्याचे फायदे :आजारी आणि दुर्बल प्राण्यांना मोहरीचे तेल दिल्याने त्यांच्या आरोग्यात चमत्कारीक बदल होतात. मोहरीच्या तेलात भरपूर चरबी असते. ज्यामुळे प्राण्यांना ऊर्जा मिळते आणि ते चपळ होतात. त्यामुळे गायी आणि म्हशींना मोहरीचे तेल देण्याची प्रथा आहे, जेणेकरून त्यांचे आरोग्य लवकर चांगले होईल. मोहरीचे तेल प्यायल्याने जनावरांची पचनशक्ती बळकट होते. त्यामुळे जनावरांना पोटासंबंधीचे आजार होत नाहीत. पशुंना मोहरीचे तेल दिल्याने वासरांची तबेत देखील सुधारते. कारण सुरुवातीला काही दिवस आपण वासरांना जनावरांचे दूध पाजतो. म्हणून वासरांना देखील त्याचा फायदा होतो. थकलेल्या जनावरांना मोहरीचे तेल थोडेसे देणे फायदेशीर ठरते. विशेषत: लांबच्या प्रवासानंतर जनावरे येतात किंवा खरेदी करून आणली जातात. अशा स्थितीत अशक्तपणा आणि थकवा आल्याने ताप येण्याची शक्यता असते. अशा वेळी मोहरीचे तेल दिल्यास प्राण्यांमध्ये लगेच ऊर्जा येत. मोहरीचे तेल जनावरांना खूप उपयुक्त असते.

उन्हाळ्यात उष्णतेपासून सुरक्षा : उन्हाळ्यात जनावरांची काळजी घेणे खूप गरजेचे असते. त्यासाठी पशुपालक देखील पशुची मोठ्या प्रमाणात काळजी घेतात. तसंच उन्हाळ्यात जनावरांना मोहरीच्या तेलाचे सेवन दिल्यास जनावरांना उष्णता संबंधित समस्यांपासून संरक्षण मिळते. दुसरीकडे जर आपण हिवाळ्याबद्दल बोललो तर, या दिवसात मोहरीचे तेल देखील प्राण्यांमध्ये उष्णता टिकवून ठेवण्यासाठी एक फायदेशीर कृती असल्याचे सिद्ध होते. पशुतज्ज्ञांच्या मते निरोगी जनावरांना मोहरीचे तेल आणि पशुखाद्य रोज देऊ नये. या गोष्टी फक्त आजारी आणि अशक्त प्राण्यांसाठीच चांगल्या आहेत. दरम्यान, आजारी व अशक्त जनावरांना १०० ते २०० मिली मोहरीचे तेलही दिले जाऊ शकते. यापेक्षा जास्त सेवन करणे जनावरांसाठी हानिकारक ठरू शकते. त्याचबरोबर गाई-म्हशींच्या पोटात वायू किंवा पचन खराब झाल्यास पशुवैद्यांच्या सल्ल्याने ४०० ते ५०० मिली मोहरीचे तेलही द्यावे. यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने जनावरांना मोहरीच्या तेलाचे सेवन द्यावे. अन्यथा जनावरांना अन्य आजारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

## बीट लागवड तंत्रज्ञान


बीट हें थंड हवामानातील येणारे पीक असून याला रंग, चव व उत्पादन चांगल्या प्रकारे येते. याचा वापर दररोजच्या आहारात केला जातो. सॅलेड, सरबत, कोशिंबीर, चटणी, रक्त वाढीसाठी याची चांगले मदत होते. भारतात पंजाब, कर्नाटक, तमिळनाडू, राजस्थान, पश्चिम बंगाल व महाराष्ट्र या राज्यांमध्ये या पिकाची लागवड केली जाते. बाजारात देखील यांची चांगली मागणी आहे.

जमिनीचा प्रकार :बिटच्या लागवडीसाठी भुसभुशीत,पाण्याचा निचरा होणारी जमीन योग्य असते. तसेच भारी जमिनीत बीटाची लागवड केल्यास बीटाच्या मुळाचा आकार वाकडा होतो. या साठी जमिनीचा सामू हा ६ ते ७.५ असावा. तसेच ९ते १० सामू असणाऱ्या क्षारयुक्त जमिनीत बीटाची वाढ चांगले होते तसेच बीट ची महाराष्ट्रात खरीप हंगामात लागवड केली जाते.

हवामान :बिट हें थंड हवामानातील पीक असून या काळातील हवामान पोषक असते बीटची रब्बी हंगामात ऑक्टोबर मध्ये बी पेरणी केली जाते परंतु महाराष्टामध्ये जून व जुलै मध्ये बियांची पेरणी केली जाते.

पिकाची जात :डेट्राईट डार्क रेड, क्रीम्सन ग्लोब, अर्ली वंडर.

लागवड :एक हेक्टरसाठी ७ ते १० किलो बियाणे लागते. बियाणांची लागवड पेरून किंवा टोकण पद्धतीने करावी. एका ठिकाणी २ बिया टोकून लागवड करावी बीटासाठी ४५ सेमी अंतरावर सरीवर करावी आणि सरी वरंबा १५ ते २० से मीटर अंतरावर बियाणे लागवड करावी. बियाणे उगवून आले की विरळणी करून एका



ठिकाणी १ च रोप ठेवावे. तसेच बी लागवड करण्या पूर्वी बियाणे रात्रभर भिजत ठेवावे म्हणजे बियाणे चांगले उगवते. बियाणे जमिनीत लागवड करण्यापूर्वी जमिनीत ओलावा असावा, बीट ची लागवड ३०-४५ बाय १५ ते २० सेमीटर अंतरावर वर करावी.

खत व्यवस्थापन :लागवडीच्या वेळी १५ ते २० गाड्या शेणखत टाकावे ६० ते ७० किलो नत्र ,१०० ते १२० किलो स्फुरद आणि ६० ते ७० किलो पालाश हेक्टरी दयावे. नत्राची अर्धी मात्रा व स्फुरद आणि पालाशची पूर्ण मात्रा बियांची लागवड करताना दयावी व नत्राची उरलेली अर्धी मात्रा ही पेरणी नंतर ४ ते ६ आठवडयांनी द्यावी.

पाणी व्यवस्थापन :कंदाच्या चांगल्या वाढीसाठी पिकाला पाण्याचा भरपूर पुरवठा करावा. जमिनीत सतत ओलावा राहील याची काळजी घ्यावी. त्यामुळे उगवण चांगली होऊन पिकांची वाढ चांगली होते. पिक वाढीच्या काळात पाण्याची कमतरता पडू देऊ नये. रब्बी हंगामात पिकाला ८-१० दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्यावे.

रोग नियंत्रण आणि त्यावरील उपाय :१) मावा- पानातील रस शोषण करतो त्यामुळे वेली निस्तेज होते पिकाची वाढ खुंटते. उपाय- टाटा माणिक ८ ते १० ग्राम १५ लिटर च्या पंप ला घेऊन फवारणी करावी. अथवा निमार्क २५- ३० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. २) तुडतुडे पानातील रस शोषण करते. उपाय- अरेवा ८ ते १० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी अथवा निमार्क २५ -३० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ३) सफेद माशी- पानातील रस शोषण करते. उपाय- उलाला ८ ते १० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ४) पाने खाणारी अळी व फळातील अळी पाने खाते व फळाच्या आत मध्ये अळी तयार होते त्यामुळे फळ वाकडे होते.

उपाय- निमार्क २५ -३० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी व किडलेली फळे काढून टाकावी नंतर फवारणी करावी. ५) मर रोग पाणी अतिजास्त दिलेल्या मुळे किंवा वातावरणातील बदलामुळे रोपाची मर होते. उपाय - पिकाच्या आवश्यक्ते नुसार पाणी दयावे तसेच रोपाच्या बुडा जवळ बुरशीनाशका चे ड्रिचिंगी करावे किंवा फवारणी करणे.

उत्पादन : बिटाची काढणी ७० ते ७५ दिवसांनी करावी. बीटच्या कंदाची वाढ ३ ते ५ से मी झाली की हाताने उपटून काढणी करावी तसेच काढणी करताना मुळ्याना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. काढणी नंतर कंदाची प्रतवारी करावी तसेच कंद विक्रीला पाठवताना त्याची पाने काढून टाकावी व कंद स्वछ धुणे. पॅकिंग हें प्लास्टिक च्या पिशवीत केल्यास कंद जास्त काळ चांगले राहतात. तर ४ ते ६ जुड्या बांधून विक्रीस पाठवले जातात. याचे सरासरी उत्पादन हेक्टरी २० ते २५ टन इतकं मिळते.




### महत्वाच्या घटना

१३७७ : पोप ग्रेगोरी अकराव्याने पाच पोपचे फतवे काढून इंग्लिश तत्त्वज्ञानी जॉन वायक्लिफची मते खोडून काढण्याचा प्रयत्न केला.
१७६२ : स्वीडन आणि प्रशियामधे हॅम्बुर्गचा तह झाला.
१९०६ : अथेन्समध्ये तिसरे ऑलिंपिक खेळ सुरु. काही काळानंतर यांची अधिकृत खेळ म्हणून मान्याता काढून घेण्यात आली.
१९०६ : राइट बंधूंना त्यांच्या उडणाऱ्या यंत्रासाठी पेटंट देण्यात आला.
१९१५ : स्कॉटलंडच्या ग्रेटना ग्रीन गावात ३ रेल्वेगाड्यांची टक्कर होऊन २२७ जण ठार आणि २४६ जण जखमी झाले.
१९१५ : प्रथम विश्व युद्धादरम्यान सोवियत राष्ट्र इटलीने मित्र राष्ट्र ऑस्ट्रिया, हंगेरी आणि जर्मनी विरुद्ध युद्ध पुकारले.
१९२७ : चीनच्या झिनिंग जवळ झालेल्या ८.३ तीव्रतेच्या भूकंपात २,००,००० लोक ठार झाले.
१९४२ : दुसरे महायुद्ध मेक्सिकोने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युद्धात उडी घेतली.
१९६० : ग्रेट चिलीयन भूकंप हा ९.५ तीव्रतेचा जगातील सर्वात शक्तिशाली भूकंप आहे.
१९६१ : हुंडाबंदी विधेयकाला राष्ट्रपतींची संमती मिळून हुंडाबंदी कायदा अस्तित्त्वात आला.
१९७२ : सिलोनने नवीन राज्यघटना स्वीकारुन ते प्रजासत्ताक बनले. त्या देशाचे श्रीलंका असे नामकरण झाले आणि त्याने राष्ट्रकुल देशांत प्रवेश केला.
१९८७ : मेरठ जिल्ह्यात हाशिमपूरा हत्याकांड झाले.
१९८९ : अग्नी' या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राचे ओरिसातील मंडीपूर येथून यशस्वीरीत्या प्रक्षेपण करण्यात आले.
२००४ : भारताचे पंतप्रधान म्हणून मनमोहन सिंग यांचा शपथविधी.
२००९ : भारताचे पंतप्रधान म्हणून मनमोहन सिंग यांचा दुसऱ्यांदा शपथविधी.
२०१५ : आयर्लंड देश सार्वजानिक जनमतदानंतर समलिंगी विवाहाला कायदेशीर ठरवण्यासाठी जगातील पहिला देश बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४०८ : हिंदू संत अन्नामचार्य यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १५०३)
१६८८ : अलेक्झांडर पोप, इंग्लिश कवी.
१७७२ : सतीची चाल कायदेशीरपणे बंद करणारे व अनेक भाषांतून प्रावीण्य मिळविलेले थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांचा बंगालमध्ये जन्म झाला.
१७८३ : विद्युत चुंबक आणि विद्युत मोटर चे शोधक विल्यम स्टर्जन यांचा जन्म. (मृत्यू: ४ डिसेंबर १८५०)
१८१३ : जर्मन संगीतकार, संगीतसंयोजक व दिग्दर्शक रिचर्ड वॅग्नर यांचा जन्म. (मृत्यू: १३ फेब्रुवारी १८८३)
१८५९ : स्कॉटिश डॉक्टर व शेरलॉक होम्स या गुप्तहेरकथांचे लेखक सर आर्थर कॉनन डॉइल यांचा जन्म. (मृत्यू: ७ जुलै १९३०)
१८७१ : संस्कृत विद्वान, भाषांतरकार व शास्त्रसुधारक विष्णू वामन बापट यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर १९३३)
१९०५ : इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाचे सहसंशोधक बोडो वॉन बोररी यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै १९५६)
१९०७ : ब्रिटिश अभिनेता, दिग्दर्शक व निर्माता सर लॉरेन्स ऑलिव्हिये यांचा जन्म. (मृत्यू: ११ जुलै १९८९)
१९२५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय कवी, व रशियन भाषेचे हिंदीत भाष्यांतर करणारे भारतीय भाष्यकार मदन लाल मधु यांचा जन्मदिन.
१९४० : इरापल्ली प्रसन्ना, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९४८ : भारतीय अभिनेता आणि पटकथालेखक नेदुमुदी वेणू यांचा जन्म.
१९५९ : भारतीय राजकारणी मेहबूबा मुफ्ती यांचा जन्म.
१९८४ : फेसबुकचे सह-संस्थापक डस्टिन मॉस्कोविट्झ यांचा जन्म.
१९८७ : सर्बियाचा टेनिस खेळाडू नोव्हान जोकोव्हिच यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

**१५४५ : भारतीय शासक शेरशाह सूरी यांचे निधन.**
**१८०२ : अमेरिकेची पहिली फर्स्ट लेडी मार्था वॉशिंग्टन यांचे निधन. (जन्म: २ जून १७३१)**
**१८८५ : जागतिक कीर्तीचे फ्रेन्च कादंबईकार, कवी आणि लेखक व्हिक्टर ह्यूगो यांचे निधन. (जन्म: २६ फेब्रुवारी १८०२)**
**१९९१ : भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक व कामगार पुढारी कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांचे निधन. (जन्म: १० ऑक्टोबर १८९९)**
**१९९५ : चित्रकार व शिल्पकार रविंद्र बाबुराव मेस्त्री यांचे निधन.**
**१९९८: लेखक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १९२८)**
**२००३ : डॉ. नित्यनाथ ऊर्फ नीतू मांडके भारतीय हृदयरोगतज्ञ.**
**२०११ : वैदिक व बौद्ध काळातील सुप्रसिद्ध भारतीय इतिहासकार तसचं, अलाहाबाद विद्यापीठातील प्राचीन इतिहासाचे प्राध्यापक व कुलगुरू गोविंदचंद्र पांडे यांचे निधन.**

# जिल्ह्यात वादळी वाऱ्याचा कहर

## अनेक ठिकाणी लग्नाचा मंडप उडाला; वीज पडून चार जनावरांचा मृत्यू



जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये पाऊस वादळ वाऱ्यामुळे लग्नातील वऱ्हाडी मंडळींची मोठी फजिती झाल्याची अनेक लग्नांमध्ये दिसून आले तसेच काही ठिकाणी तर लग्नातील मंडपच उडून गेले. यामुळे दुपारी दोन वाजल्यापासून जनजीवन विस्कळीत झाले होते २० मे रोजी जिल्ह्यात विविध ठिकाणी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या अचानक आलेल्या आपत्तीत नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. वीज पडून चार जनावरे ठार झाली असून, तसेच अंबड शहरांमध्ये बऱ्याच ठिकाणी झाड पडल्याच्या घटना घडल्या यामुळे रस्त्यावर वाहतूक ठप्प झाली होती याप्रकरणी अंबड नगरपरिषद चे कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनेस्थळे जाऊन रस्त्यावर पडलेले झाडे बाजूला करण्यात आले व रस्ता सुरळीत चालू केला आपत्ती व्यवस्थापन कर्मचारी यशवंत कारके, अमोल खरात, हैदर पठाण, आदिल शेख यांच्यासह इतर स्वच्छता कर्मचारी यांनी तत्काळ घटनेस्थळी जाऊन रस्ता मोकळा केला.बदनापूर तालुक्यातील मांडवा गावात लग्नाचा मंडप उडून गेला यावेळी वऱ्हाडी मंडळींनी जीव वाचवण्यासाठी अक्षरश धावपळ सुरू केली .

अंबड व परिसरात झाडे कोसळून मोठे नुकसान मार्डी रोडवर एक मोठे बाभळीचे झाड कोसळले, ज्यामुळे वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. शहरातील अनेक भागांमध्ये झाडे कोसळून घरांचे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे जालन्याला पाणीपुरवठा करणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्रावर झाड कोसळल्याने पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. तसेच वडीगोद्री परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. मांडवा गावात आज सायंकाळी लग्नाचा कार्यक्रम सुरू होण्याच्या अवघ्या काही मिनिटांपूर्वी वादळी वारे सुरू झाले. काही क्षणांतच मंडप उडून गेला आणि उपस्थित पाहुण्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सर्वांनी धावपळ करत आपला जीव वाचवला, मात्र लग्नाचा आनंद क्षणात गडद ढगांमध्ये हरवून गेला. अंबड तालुक्यातील लालवडी येथील शेतकरी शिवाजी खरात यांचा एक बैल वीज पडून जागीच ठार झाला, तर दुसरा बैल जखमी झाला आहे. रोहीलागड येथे पांडुरंग टकले यांच्या दोन म्हशीच्या अंगावर वीज पडून मृत्यू झाला. मुरमा येथील शेतकरी खुशालराव नरसिंगराव उढाण यांच्या गट क्रमांक ५४ मधील गाईच्या अंगावर रात्री वीज पडून मृत्युमुखी पडली. याप्रकरणी मृत्युमुखी पडलाली जनावरांची मदत शेतकऱ्यांना मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे अनेक गावांमध्ये देखील आज पावसाने जोरदार हजेरी लावली. वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. उभ्या पिकांचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.प्रशासनाने सावधगिरीचे आव्हान करण्यात आले होते. हवामान विभागाने पुढील काही दिवस जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा दिला आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे तसेच सुरक्षित स्थळी थांबण्याचे आवाहन केले आहे.




## एक राज्य एक नोंदणी अंतर्गत खरेदी विक्री दस्त नोंदणी अमलात आणू नका

### अखिल भारतीय मराठा महासंघाची मागणी

बीड। प्रतिनिधी

जमीन विकसन विक्रीच्या पावर ऑफ ऍटोर्नी व जमीन खरेदी विक्री दस्त नोंदणी या संदर्भात राज्य शासनाच्या ''एक राज्य एक दस्त नोंदणी प्रणाली'' स्थगित करण्यात यावी ही मागणी करत आज अखिल भारतीय मराठा महासंघ बीड जिल्हाच्या वतीने मा.अप्पर जिल्हाधिकारी मॅडम यांना एक सविस्तर निवेदन देण्यात आले.

महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय राजेंद्र कोंढरे यांच्या आदेशान्वये देण्यात आलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले की शासनाच्या प्रस्तावित या एक राज्य एक नोंदणी अंतर्गत खरेदी विक्री दस्त नोंदणी जमीन विकसनच्या विक्रीच्या पॉवर ऑफ अटर्नी नोंदविण्यास सुरुवात केल्याने यात मोठा गैर व्यवहार होणार असल्याने, न्यायालयीन व प्रशासकीय यंत्रणेवर ताण येणार असल्याने याशिवाय नागरिक दर महिन्याला जमीन खरेदी विक्री करत नसल्याने केवळ सोयीसाठी काहीतरी नाविन्यपूर्ण करतो हे दाखवण्यासाठी हा शेतकरी घातक निर्णय अमलात आणू नये अशी मागणी करण्यात आली. निवेदन देते वेळी मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले बीड जिल्हाअध्यक्ष बापुसाहेब साळुंके बीड जिल्हा उपाध्यक्ष प्रमेश्वर कवट बीड जिल्हा उपाध्यक्ष बापुसाहेब मराठे जिल्हा उपाध्यक्ष शाम गायकवाड जिल्हा प्रशिध्दी प्रमुख सुरेश गिराम बीड जिल्हा संघटक राहूल शिंदे जिल्हा सरचिटणीस बंडु आप्पा कोडगडे बीड शहर अध्यक्ष दत्ता शेळके निवेदनाच्या प्रती मा.मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री महसूल मंत्री पालकमंत्री महसूल राज्यमंत्री यांनाही ई-मेल द्वारे पाठवण्यात आल्या त्याचप्रमाणे अप्पर मुख्य सचिव, महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क महाराष्ट्र,नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य पुणे यांनाही पाठविण्यात आल्या असे प्रसिद्ध केलेल्या पत्रकात कळविले.

## थोडक्यात



### प्रा. डॉ. काकासाहेब पोकळे राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

परळी। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित कला व वाणिज्य महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. काकासाहेब पोकळे यांना नुकतेच राष्ट्रीय उत्कृष्ट शिक्षक २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदरील पुरस्कार डॉ. पोकळे यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत रियल इंडो ग्लोबल व्हिजन सोशल डेव्हलपमेंट गुरुकुल फाउंडेशन धुळे महाराष्ट्र यांच्यातर्फे प्रदान करण्यात आला. डॉ. काकासाहेब पोकळे यांच्या ह्या उपलब्धीबद्दल संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ.योगेश क्षीरसागर, सदस्य डॉ. सारिका क्षीरसागर तसेच प्रशासकीय अधिकारी डॉ. व्ही. टी. देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. सिद्धार्थ जाधव तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम राख व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात अकरावीच्या ऑनलाईन नोंदणीस सुरुवात

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रम या वर्गांच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया २१ मे पासून सुरु करण्यात आली आहे.ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेचे उद्घाटन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, प्रवेश समितीचे प्रा. विठ्ठल शिंदे, डॉ. तानाजी आगळे, डॉ. मच्छिन्द्र शेळके, प्रा. सतीश कदम आदी उपस्थित होते. इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी २१ मे ते २८ मे हा अवधी देण्यात आलेला असून इच्छुक पालक व विद्यार्थ्यांनी २८ मे च्या आत नोंदणी करून घ्यावी असे आवाहन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले आहे.



## बीड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती बाबत

बीड। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे कार्यालयासाठी ''जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी'' हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठी जाहिरात व विहीत केलेला अर्जाचा नमूना या कार्यालयाचे वेबसाईट ... वर दि.२१.०५.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

''जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी'' या कंत्राटी पदासाठी उमेदवाराने आपला विहीत नमून्यातील अर्ज -४ साईजच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखित - हस्तलिखित करुन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड-४३११२२ या पत्यावर दिनांक २३ मे, २०२५ रोजीपासून ते दि. ०५ जून, २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत विहीत नमून्यात अर्ज पोहोचेल अशा रितीने पोस्टाद्वारे किंवा आवक जावक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे समक्ष सादर करावेत.

या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या विहीत नमुन्यातील अर्जाचा विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. ''जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी'' या कंत्राटी पदासाठी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी, पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन) अशी आहे. तसेच प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर भरती प्रक्रियेसंदर्भात पुढील माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळ ... वर प्रसिद्ध करण्यात येईल. ''जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी'' हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पार पाडली जाणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

## गुजर समाज बांधवांनी नेहमी ध्येय ठरवून कार्य करावे –रतन गुजर



बीड । प्रतिनिधी

दि.२० मे २०२५ मंगळवार रोजी जिल्ह्यातील गुजर समाज देवसेनेची विविध विषयावर प्रश्नांसाठी महत्वपुर्ण बैठक पंढरी कॉम्प्लेक्स, धानोरा रोड, बीड या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती या बैठकीला गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाणे, जिल्हा सचिव विनायक गुजर, जिल्हा कोषाध्यक्ष गजानन बहिरवाळ, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र गुजर, जिल्हा उपाध्यक्ष अशोक घुशीर, शिरूर तालुकाप्रमुख शहादेव डोंगर, तुकाराम डोंगर, बाळू डोंगर, सुनिल बहिरवाळ, नारायण बहिरवाळ, लक्ष्मण बहिरवाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील बैठक ही गुजर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी, तसेच समाज बांधव-भगिनींसाठी, समाजातील छोट्या-मोठ्या अडचणी सोडवण्यासाठी या बैठकीच्या माध्यमातून पदाधिकार्यांची बांधणी करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाध्यक्ष रतन गुजर म्हणाले की गुजर समाज बंधु-भगिनी यांनी आपले ध्येय फिक्स करावे व त्या दिशेने मार्गक्रमण करावे एकदा का ध्येय फिक्स झाले की वाटचाल सोपी होते अन्? ध्येय गाठता येते समाज प्रगत होतो आणि कोणतीही अडचण यामध्ये आली तर आम्ही बांधवांच्या पाठिशी खंबीरपणे उभा राहू असे आश्वासन देखील त्यांनी दिले. तसेच दि.३० मे २०२५ रोजी होणार्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन देखील यावेळी करण्यात आले आहे.या करिता मांडवजाळी राधाकृष्ण आश्रम या ठिकाणी सर्व विद्यार्थ्यांनी आपले मार्क आणि नाव गुजर समाज देवसेनेच्या पदाधिकार्याकडे द्यावे म्हणजे आपली गैरसोय होणार नाही असे ते म्हणाले.

## उद्या राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाची आष्टी व पाटोदा तालुका स्तरावर बैठका

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाची आष्टी व पाटोदा येथे तालुका स्तरावरील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्वपूर्ण बैठका गुरूवार दि. २२ मे २०२५ रोजी सकाळी ११ वा.साईदत्त मंगल कार्यालय आष्टी येथे तर दुपारी ३ वाजता पाटोदा येथे बैठका आयोजित केल्या आहेत.पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या बैठकीस प्रदेश युवक अध्यक्ष महेबुब शेख, प्रदेश उपाध्यक्ष ॲड.नरसिंह जाधव, प्रदेश सरचिटणीस ॲड. हेमाताई पिंपळे, महिला आघाडी देशमुखताई आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य निवडणुका घेण्याचा निर्णय राज्य सरकारला दिला आहे. या निवडणुका आगामी काळात कधीही होऊ शकतात. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदा या निवडणुका कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाच्या असतात. आगामी निवडणुकांमध्ये पक्षाला भरघोस यश प्राप्त करण्यासाठी पक्ष जोमाने कामाला लागला आहे. या अनुषंगाने व पक्ष मजबूती करणाच्या दृष्टीने तालुका निहाय बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे. पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधून नवीन पदाधिकारी नेमणुका बाबत सविस्तर चर्चा या बैठका दरम्यान होणार असून प्रदेश अध्याक्षां कडे संभाव्य पदाधिकारी यांची यादी पाठवली जाईल व त्यांच्या आदेशानुसार लवकरच पदाधिकाऱ्यांच्या निवडी घोषीत केल्या जाणार आहेत. सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन आष्टी पाटोदा तालुका राष्ट्रवादीच्या वतीने करण्यात येत आहे.

## आकाशात वीज चमकत असताना नागरिकांनी घ्यावयाच्या खबरदारी

बीड। प्रतिनिधी

हंगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या विविध भागात वीज चमकण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. वीज कोसळणे ही एक गंभीर नैसर्गिक आपत्ती असून नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्व नागरिकांना खालील खबरदारीचे उपाय काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

वीज चमकत असल्यास घ्यावयाच्या खबरदारी: विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर राहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

या गोष्टी करू नका: आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली आंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाईन यांना स्पर्श करू नका. तसेच कुठल्याही विद्युत उपकरणाचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या साह्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडांच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे राहू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारात अथवा खिडकीतून वीज पडताना बाहेर पाहू नका व बाहेर थांबणे तितकेच धोकादायक आहे.

उपयोगी मोबाईल ॲप्सची माहिती: दामिनी ॲप - हे ॲप भारतीय हवामान विभागाने () विकसित केले असून विजेच्या गडगडाट आणि संभाव्य ठिकाणांची माहिती नागरिकांना वेळेवर मिळवून देण्याचा उद्देश आहे. हे ॲप आपल्या स्थानाच्या २० किमी परिसरात वीज कोसळण्याची शक्यता असल्यास तात्काळ अलर्ट पाठवते. वापरण्यास अगदी सोपे असून मराठीसह विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे. आणि वर हे ॲप मोफत उपलब्ध आहे. सचेत ॲप - हे ॲप आपत्ती व्यवस्थापन विभागाने विकसित केले असून भूकंप, पूर, वीज चमकणे, वादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या अलर्टस पुरवते. स्थानिक हवामान आणि संभाव्य आपत्तींची अचूक माहिती, सजगता आणि मार्गदर्शन यातून मिळते. या ॲपच्या साह्याने नागरिक वेळेत सुरक्षिततेचे पावले उचलू शकतात. आणि वर मोफत उपलब्ध आहे. आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी वरील खबरदारीचे उपाय वेळेवर आणि शिस्तबद्धपणे पाळावेत. प्रशासन आपत्ती व्यवस्थापनासाठी सदैव सज्ज असून नागरिकांनी देखील सजग राहणे गरजेचे आहे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.

क्र.२०२५ / संकीर्ण/जन्म मृत्यू नोंदणी/ कावी.
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पाटोदा
दि.२०/०५/२०२५

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

**जन्म आणि मृत्यूची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम वे११ अन्वये**

पाटोदा तालुक्यातील सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अर्जदार कांतीलाल विश्वनाथ पवळ रा. चुंबळी ता. पाटोदा जि. बीड यांचा मुलगा नामे सार्थक कांतीलाल पवळ याचा जन्म दि. ०४/०९/२०१३ रोजी राहते घरी मौजे चुंबळी मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू अर्जदाराची जन्माचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दि.२०/०५/२०२५ रोजी माझे सही व शिक्कानिशी दिला.

आदेशावरून
**स्वाक्षरीत**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार पाटोदा

क्र.२०२५ / संकीर्ण/जन्म मृत्यू नोंदणी/ कावी.
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पाटोदा
दि.२०/०५/२०२५

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

**जन्म आणि मृत्यूची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम वे११ अन्वये**

पाटोदा तालुक्यातील सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अर्जदार पव्हणे अशोक रघुनाथ रा. चुंबळी ता. पाटोदा जि. बीड यांचा मुलगी नामे आर्या अशोक पव्हणे हिचा जन्म दि. १३/१०/२०१८ रोजी राहते घरी मौजे चुंबळी मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू अर्जदाराची जन्माचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दि.२०/०५/२०२५ रोजी माझे सही व शिक्कानिशी दिला.

आदेशावरून
**स्वाक्षरीत**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार पाटोदा

## मुख्याधिकारी यांच्या बदलीसाठी खुर्शीद आलम यांची उपमुख्यमंत्र्यांकडे दुबार मागणी

बीड। प्रतिनिधी

आज दि.१९/५/२०२५ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून बीडच्या दौऱ्यावर आले होते यावेळी बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा शरदपवार राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे आज दुसऱ्यांदा नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे यांची तातडीने बदली करावी अशी मागणी केली आहे, निवेदनात म्हटले आहे की जेव्हा पासून बीड नगरपरिषदेत मुख्याधिकारी म्हणून श्रीमती निता अंधारे आल्या आहेत तेव्हापासून बीड शहरात सहा सहा महिने साफसफाई होत नाहीयेत त्यामुळे स्वच्छतेचा बट्ट्याबोळ झालेला आहे, पंधरा ते २० विस दिवस पिण्याचे पाणी मिळत नाहीये, आठ आठ महिने विद्युत खंब्यावर पथदिवे बंद असतात.


रजिस्टराचे न झाल्यामुळे रजिस्टरांचा बुग्गा झाललेला आहे म्हणून मिळत नाहीये त्यामुळे अनेक गरीब घरकुलापासुन वंचित झाले आहेत, नगरपरिषदेच्या प्रत्येक विभागात भ्रष्टाचार दिसून येते, विकास होतांना दिसत नाहीये मात्र कोट्यवधीचे बिले निघत आहेत. जुनेच कामाचे नवे किंवा डबल बिले दिली जाते असे वाटत आहेत, बीड नगरपरिषदेत प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार वाढलेला दिसून येत आहे, नगरपरिषदेचा भोंगळपणा आणि भ्रष्टाचार दररोज अनेक वर्तमानपत्रांमध्ये दिसून येत आहेत, नाल्यावरचे अतिक्रमणे काढतांना धनदांडग्यांचे सोडून गोरगरिबांचेच अतिक्रमण काढले जाते आणि विशेष म्हणजे नाल्यावरचे अतिक्रमणे काढल्यानंतर गटारी साफ केले जात नाहीये, मुख्याधिकारी अंधारे प्रशासकाच्या नावाखाली मनमानी अंधाधुंद कारभार करत आहेत, स्वच्छतेसाठी,पाणीसाठी, लाईटसाठी आणि रस्ते नाल्यांचे विकास कामांसाठी मुख्याधिकारी निता अंधारे यांची तातडीने बदली करणे अतिशय आवश्यक आहे म्हणून आज दुसऱ्यांद उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे नागरिकांना मुलभूत सुविधेपासुन वंचित ठेवणार्या श्रीमती नीता अंधारे यांची तातडीने बदली करावी अशी मागणी खुर्शीद आलम यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या कडे केली आहे तसेच दुसऱ्यांदाही केलेली मागणी मान्य न झाल्यास जन दोंलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा शरदपवार राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी दिला आहे,

# ना.अजितदादांचे घड्याळ प्रा.ईश्वर मुंडे यांच्या हातात

**केज/धारूर । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर नौकरी करून खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून स्वेछा सेवानिवृत्ती घेतलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात धारूर तालुकाध्यक्ष,ओबसी सेल प्रदेश सरचिटणीस व सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी सेल प्रदेशाध्यक्ष या पदांवर प्रभावीपणे कार्य केले.**

सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आ.प्रकाशदादा सोळंके यांच्या विजयात प्रा.ईश्वर मुंडे यांचा मोलाचा वाटा होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटीनंतर प्रा.ईश्वर मुंडे यांनी खा.शरदचंद्र पवार यांच्यासोबत राहणे पसंद केले. खा.शरदचंद्र पवार साहेब व आ.जयंतराव पाटील साहेब यांच्या संम्मतीने प्रा.ईश्वर मुंडे यांनी बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूक २०२४ लढविण्यासाठी बीड जिल्ह्यात जन संपर्क वाढवला होता परंतू शेवटच्या टप्प्यात खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचा पक्षात प्रवेश झाल्याने प्रा.ईश्वर मुंडे यांना माघार घ्यावी लागली होती. या वेळी प्रा.ईश्वर मुंडे यांनी समाजाचा रोष पत्करून पक्षाचे उमेदवार खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचा प्रचार केला होता.नंतर प्रा.ईश्वर मुंडे यांनी विधानसभा निवडणुक २०२४ साठी माजलगाव मतदारसंघाचा निवडणुक पुर्व जन संपर्क दौरा पूर्ण केला होता. या वेळेला ही श्री मोहनराव जगताप यांचा पक्षात प्रवेश झाल्याने प्रा.ईश्वर मुंडे यांना संधी मिळाली



नाही.या नाराजीने प्रा.ईश्वर मुंडे यांनी माजलगाव विधानसभेची निवडणूक अपक्ष लढवून रंगत आनली होती परंतू शेवटच्या टप्प्यात आ.जयंतराव पाटील यांच्या विनंतीवरून खा.सुप्रीयाताई सुळे यांच्या माजलगाव येथील जाहीर प्रचार सभेत पक्षाचे उमेदवार श्री.मोहनराव जगताप यांना पाठींबा देवून त्यांच्या विजयासाठी प्रयत्न केले होते. आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजलगाव मतदारसंघ व बीड जिल्ह्यात प्रमाणीक पणे केलेले काम खा.शरदचंद्र पवार साहेब व आ.जयंतराव पाटील साहेब यांना वास्तव सांगणारे मोठया मनाचे नेतृत्व बीड जिल्ह्यात नसल्यामुळे व पक्ष संघटनेपेक्षा स्वत:ची मानसे निर्माण करण्याचे राजकारण बीड जिल्ह्यात सुरू असल्यामुळे आपण खा.शरदचंद्र पवार साहेब यांना सोडून जड अंत:करणाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर आबा चव्हाण यांच्या विनंतीवरून श्री रमेशराव आडसकर यांच्यासोबत वानखडे स्टेडियम, मुंबई येथे ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात ना.अजितदादा पवार,खा.सुनीलराव तटकरे यांच्या हस्ते पक्षात प्रवेश केला असल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी केज येथील पक्ष नोंदणी कार्यक्रमात आपल्या भाषणात सांगितले. पुढे बोलताना प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की,रमेशराव आडसकर हे कार्यकर्त्यांना पद व प्रतिष्ठा मिळवून देणारे नेते आहेत या मुळे आपण त्यांच्या नेतृत्वाखालील पक्ष वाढीचे काम करून सर्व नव्या जुन्यांना सोबत घेऊन जन हिताची कामे करत राहणार आहोत.या वेळी स्टेजवर श्री रमेशराव आडसकर,ॲड.राजेश्वर आबा चव्हाण,श्री.अंकुशराव इंगळे,श्री.दिलीपराव गुळभिले,श्री.ऋषिकेश आडसकर, श्री.राजाभाऊ औताडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## छगन भुजबळ यांनी मंत्रीपदाची शपथ घेताच पाटोद्यात जल्लोष

**पाटोदा । प्रतिनिधी**

**ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते छगन भुजबळ यांनी आज राजभवनात मंत्रीपदाची शपथ घेतली. या घडामोडीने संपूर्ण राज्यासह पाटोदा तालुक्यातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले.**



भुजबळ यांच्या शपथविधीची बातमी समजताच त्यांच्या समर्थकांनी पाटोदा शहरातील संत सावता महाराज चौक येथे एकत्र येऊन जल्लोष साजरा केला. फटाके वाजवून आणि घोषणा देत त्यांनी आपला आनंद व्यक्त केला. भुजबळ यांच्या कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. ''भुजबळ साहेबांचे मंत्रीपद ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे,'' असे भावनिक उद्गार समता परिषद तालुका अध्यक्ष डिगांबर नाईकनवरे यांनी व्यक्त केले. मंत्री पदाची छगन भुजबळ यांनी शपथ घेताच पाटोद्यात जल्लोष यामध्ये पाटोदा तालुक्यातील समता सैनिक व नागरि उपस्थित होते.

## आरोग्य विभागाचे पावसाळ्यापूर्वी उपाययोजनांकडे दुर्लक्ष

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा शहरासह तालुक्यात सध्या अवकाळी पावसामुळे डासाचे प्रमाण वाढले असून रोगराई होण्याची दाट शक्यता असून यामध्ये पाटोदा तालुका आरोग्य अधिकारी यांचे दुर्लक्ष जाणवत असून तात्काळ ग्रामीण भागात फवारणी करून पाणी नमुने तपासणीसाठी मागणी होत आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की तालुका सध्या अवकाळी पावसाचे थैमान असून ठीक ठिकाणी पाणी साचत असून यामुळे या घाणीच्या साम्राज्यामुळे डासाचे प्रमाण वाढत आहे तसेच अनेक साथीचे रोग पैलवाण्याची शक्यता आहे सध्या आरोग्य विभाग मात्र गाढ झोपेत असून कोणत्याही प्रकारची त्यांनी पावसाळ्यापूर्वी उपाययोजना केले नाही असे दिसते सर्वत्र स्वच्छ पाहिजे पण हे जाणवत नसून कोणत्याही गावात सध्या सर्वे नाही याकडे मात्र तालुका आरोग्य अधिकारी यांचे दुर्लक्षित जाणवत असून तरी याकडे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी तात्काळ लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.



**बीड : अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी आज महाराष्ट्रराज्याच्या कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतली. यावेळी मुंबई येथे त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड.सुभाष राऊत, शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत, रणजित सोन्नर, अजिंक्य सुरवसे आदी.**

## जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या कार्यपद्धतीवर प्रभावित होऊन असंख्य तरुणांचा शिवसेनेत प्रवेश

**बीड । प्रतिनिधी**

**शिवसेना जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारून आज उल्हास गिराम यांच्या पक्ष कार्यास दोन महिने पुर्ण होत आहेत. त्यांची विचारसरणी, सामान्य लोकांच्या गरजाशी निगडित आंदोलने याला प्रभावित होऊन बीड शहरातील बार्शीनाका परिसरातील असंख्य तरुणांनी उल्हास गिराम यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.**



शिवसेना पक्षफुटी नंतर बीड जिल्यातील शिवसैनिक बॅकफुट आला होता. जिल्हाप्रमुख म्हणून उल्हास गिराम यांनी जबाबदारीचे भान ठेऊन जुन्या-नव्या शिवसैनिकांची मोट बांधून सामान्य शिवसैनिकांत उत्साह निर्माण केला. सामान्य जनता ज्या छोट छोटया समस्यानी ग्रासली आहे, हे हेरून आंदोलने उभारली. उल्हास गिराम यांच्या याच कार्यपद्धतीला प्रभावित होऊन आज शेकडो तरुण पक्ष प्रवेशा संदर्भात विचारणा करत आहेत. याचाच एक भाग म्हणजे आज बीड शहरातील बार्शीनका परिसरातील युवक मछिंद्र काळे, दिपक अंकुशे, परशुराम काळे, कृष्णा काळे, अनिल अंकुशे, सोनु रोकडे, दुसरा दीपक अंकुशे, करण अंकुशे, गोरख अंकुशे, पप्पु लोंढे, गणेश रोकडे, लखन काळे, अमोल लोंढे, मछिंद्र अंकुशे सह असंख्य युवकांनी प्रवेश केला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ माहुवाले, सुशील पिंगळे, सतिशसिह परदेशीं, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर, विशाल तांबे सह शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## मंजरथ येथील घाटाची स्वच्छता करत केली गंगाआरती

### अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी वर्षानिमीत्त भाजपाचा उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमीत्त तालुक्यातील मंजरथ येथील गोदावरी नदीकाठावरी घाटाची स्वच्छता करत गंगाआरती भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज दि. २१ मे २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता करण्यात आली.



यावेळी भाजपाच्या तालुकाध्यक्षा रूपाली शरद कचरे, ज्ञानेश्वरी सरवदे, विनायक रत्नपारखी, डॉ. अभिजीत सोळंके, शरद कचरे, संतोष वाघमारे, गणेश जोशी, मनोज कोरडे, अविनाश कांडुरे, गौरी देशमुख, वैष्णवी होके यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना रूपाली कचरे यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या जिवनचरित्रावर प्रकाश टाकला. एक सक्षम आणि न्यायप्रिय शासक म्हणुन अहिल्याबाई यांची ओळख आहे. त्यांनी राज्यकारभारात धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक सुधारणा करत कारभार केला. अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि जलव्यवस्थापनाची कामे केली. ज्यामुळे लोकांना अनेक सुविधा मिळाल्या. तालुक्यातील मंजरथ येथील गोदावरी नदीवरील घाट देखील त्यानीच बांधलेला असुन आजघडीला सुस्थितीत आहे. परंतु येणा-या भाविकांच्या वर्दळीने ◀◀ पान ३ वर

## विनयभंग केल्याच्या आरोपातून दत्ता बाबासाहेब तोंडे यांचे निर्दोष मुक्तता

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिनांक ८/१०/२०१६ रोजी दुपारी ठीक दोन वाजण्याच्या सुमारास घरी एकटे असताना आरोपी दत्ता बाबासाहेब तोंडे राहणार नागझरी तालुका केज जिल्हा बीड ह. मु. साळेगाव ता. केज जिल्हा बीड यांनी फिर्यादीचे घरात जाऊन घरात कोणी नसल्याचे पाहून फिर्यादीचे हाताला वाईट हेतूने धरून तिचा विनयभंग केल्या प्रकरणी फिर्यादीने पोलीस स्टेशन धारूर येथे दिलेल्या



**धारूर न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल**

फिर्यादी वरून आरोपीचे विरुद्ध कलम ३५४,४५२, ५०४,५०६ भारतीय दंड संहिता नुसार गुन्हा क्रमांक १८२ २०१६ प्रमाणे दाखल झालेला होता सदर प्रकरणात पोलीस स्टेशन धारूर यांनी तपास करून आरोपी विरुद्ध कलम ३५४ ४५२ ५०४ ५०६ भारतीय दंड संहितेप्रमाणे माननीय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब धारूर यांच्या न्यायालयात चार्जसीट दाखल केलेले होते.

सदर प्रकरणी माननीय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब धारूर यांचे न्यायालयात फिर्यादी व साक्षीदार ◀◀ पान ३ वर

## काँग्रेसच्या वतीने बीडमध्ये तिरंगा रॅली

### मोटार सायकल रॅली काढून सैनिकांच्या प्रति काँग्रेसने दाखवली सद्भावना

बीड । प्रतिनिधी

पाकिस्तानच्या सततच्या भ्याड हल्ल्याला भारतीय सैन्याने मोठ्या ताकतीने उत्तर देत पाकिस्तानला चार दिवसांत गुडघे टेकायला लावले व भारतीय सैन्याने मिळवलेला हा विजय केवळ सैन्याचा आहे म्हणून भारतीय सैन्याला सलाम करण्यासाठी व भारतीयांची असलेली संवेदना हिच खरी देशभक्ती असून या वीरांच्या पराक्रमाला वंदन करण्यासाठीच



काँग्रेस पक्षाच्या वतीने तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते. बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून या रॅलीची ◀◀ पान ३ वर

### स्व. राजीव गांधी यांना अभिवादन

आज भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न स्व राजीव गांधी यांचा स्मृतिदिन असल्याने जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या सह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अंशत: अनुदानित शाळा टप्पा वाढीची अंमलबजावणी पावसाळी अधिवेशनात-उपमुख्यमंत्री

### बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे अजित पवार यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

**१४ ऑक्टोबर २०२४ च्या विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करून येत्या पावसाळी अधिवेशनात भरीव आर्थिक निधीची तरतूद करून आमचा प्रलंबित असणारा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजित पवार यांनी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या शिष्टमंडळाला दिले.**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित पवार हे काल दि.१९ मे रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने राज्याचे अर्थमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या मध्ये प्रामुख्याने राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेध्याशानुसार वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील सर्व विनाअनुदान आणि अंशतः अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीचा निर्णय आपणच घेतला आहे. काही कारणास्तव निधी उपलब्ध झालेला नाही; परंतु येत्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील सर्व विनाअनुदानित शाळासह अंशतः अनुदानित शाळांच्या वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या भरीव अशा आर्थिक निधीची तरतूद करून वाढीव टप्प्याचे अनुदान मंजूर करून तुमचा प्रलंबित राहिलेला प्रश्न मार्गी लावणार असल्याचे ना. अजित पवार यांनी या वेळी सांगितले. त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात वाढीव टप्प्याच्या निधीची तरतूद होऊन खूप दिवसांपासून टप्पा वाढीचा असलेला हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याचे संकेतच अजित पवार यांनी दिल्याने विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात चैतन्याचे वातावरण ◀◀ पान ३ वर



## पाटोदा शहरात पावसाचे दमदार आगमन

**पाटोदा । प्रतिनिधी**

उन्हाळ्याचे शेवटच्या टप्प्यात गेल्या काही दिवसात तालुका भर ढगाळ वातावरण आहे तीन दिवसापूर्वी झालेल्या तुफान अवकाळी पावसा नंतर मंगळवारी पुन्हा अवकाळी पावसाने पाटोदा शहरात परिसरात अक्षरात अक्षरशः पावसाळा व अवतरला वेगवान वारे विजयचा कडकडे आणि पावसाचे एकत्र बॅटिंग करत उन्हाळी ची तीव्रता संपवली आठवडाभरात दोन ते तीन वेळा झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकरी सुखावला हे मशागतीचे कामे वेगाने होणार असून उष्णतेचे धक्क कमी झाल्याने सामान्य नागरिक शिकवले आहेत गुरुवारी रात्री जोरदार पाऊस झाल्यानंतर मागील चार दिवसात तालुका वर कमी अधिक पावसाच्या सरी बरसल्या काही भागातील शेतीमधून पाणी वाहिले घडणीस आलेल्या आंबा पिकास फटका बसला असला तरी पाणीटंचाईची तीव्रता कमी झाली आहे शेतात जनावराला उपलब्ध झाले आहे मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याची मला पावसाने सुरुवात केली सहा वाजेच्या सुमारास हवा विजयाचा कडकडे जोरदार पाऊस यामुळे चक्रवण्यात पावसाळा उतरले तेव्हा तर निर्माण झाले मागील पडलेल्या पाऊस आणि मंगळवारच्या विरोधात पावसामुळे खरिपाच्या मशागतीला वेग आला आहे यंदा वेळेत पाऊस पडल्याने वेळेवर त्यांनी होतील आणि त्यामुळे उत्पन्न वाढीस मदत होईल अशी चिन्हे आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. नारळीकर यांच्यावर अंत्यसंस्कार, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी घेतले अंत्यदर्शन

पुणे । प्रतिनिधी

**जागतिक ख्यातीचे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्यावर बुधवारी (दि. २१) पुणे शहरातील वैकुंठ स्मशानभूमीत सरकारी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी सकाळी आयुका या संस्थेत येऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अंत्यदर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण केले.**



डॉ. नारळीकर यांचे पार्थिव बुधवारी सकाळी त्यांनीच १९८८ मध्ये स्थापन केलेल्या आंतर विद्यापीठ खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र केंद्र (आयुका) येथे आणण्यात आले. तेथे संस्थेतील प्राध्यापकांसह आजी-माजी विद्यार्थी आणि डॉ. नारळीकर यांच्या दोन मुली गिरीजा आणि लिलावतीसह इतर नातेवाईक आले होते. त्यांचे पार्थिव आयुकातील सभागृहात ठेण्यात आले होते. जेथे अल्बर्ट आईनस्टाईन, न्युटन, भास्कराचार्य या शास्त्रज्ञांचे पुतळे आहेत तो परिसर सकाळपासून गर्दीने भरून गेला होता.

सकाळी सव्वाअकराच्या सुमारास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आयुका संस्थेत आगमन झाले. त्यांनी डॉ. नारळीकरांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी डॉ. नारळीकर यांच्या मुलींची भेट घेत सांत्वन केले. याप्रसंगी पोलीस दलाने सलामी, शोकशस्त्र तसेच बाजूशस्त्र सलामी दिली. दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून डॉ. नारळीकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, पुणे शहर सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा आदी उपस्थित होते.

डॉ. नारळीकरांच्या संकल्पनेतूनच आयुका संस्थेची इमारत साकारली. याच ठिकाणी हिरवळीवर त्यांनी थोर शास्त्रज्ञ आयझॅक न्युटन, अल्बर्ट आईनस्टाईन, भास्कराचार्य यांसह आणखी काही शास्त्रज्ञांचे पुतळे उभारले. त्या सोमरील हॉलमध्ये त्यांचे पार्थिक ठेवण्यात आले होते. प्राध्यापक, विद्यार्थी आणि त्यांच्यावर प्रेम करणारे नागरिक अंत्यदर्शन घेतल्यावर या प्रांगणातील पुतळ्यांजवळ गर्दी करून बसले होते. लहानमुलेही पुष्पहार, फुले घेऊन त्यांच्या अंत्यदर्शनाला आली होती. सकाळी १० ते दुपारी १२ पर्यंत त्यांचे पार्थिव या ठिकाणी ठेवण्यात आले होते. देशाच्या कानाकोपर्यातून डॉ. नारळीकरांचे विद्यार्थी आणि स्नेही आले होते.

वैकुंठ स्मशानभूमीत सरकारी इतमामात अंत्यसस्कार

दुपारी एक वाजेच्या सुमारास डॉ.नारळीकरांचे पार्थिव वैकुंठ स्मशानभूमीत आणण्यात आले. तेथे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी पुष्पचक्र अर्पण केले. यावेळी पोलीस दलाच्या तुकडीने २१ बंदुकीतून तीन फैरी झाडून मानवंदना दिली. त्यानंतर विद्युत दाहिनीत अंत्यसंस्कार झाले.

# पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नवलकिशोर राम

पुणे । प्रतिनिधी

२००७ च्या बॅचचे आयएएस अधिकारी नवल किशोर राम यांची पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.



नवल किशोर राम यांनी २०१४ च्या निवडणुकांच्या काळात बीडच्या जिल्हाधिकारी पदाची जबाबदारी चोखपणे सांभाळली होती. पुढे ते केंद्र सरकारमध्ये प्रतिनियुक्तीवर गेले होते.

३१ मे २०२५ रोजी पुणे महानगर पालिकेचे विद्यमान आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले हे सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या पदभार नवल किशोर राम हे घेतील. २१ मे रोजी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने आदेश काढून ३१ मे रोजी पुणे आयुक्त पदाचा पदभार घ्यावा, असं म्हटलं आहे. पुणे शहराला एक शिस्तप्रिय आणि प्रशासनाची उत्तम जाण असलेला अधिकारी मिळाला आहे.नवल किशोर राम हे २००७ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. ते मूळ बिहारमधील चंपारण जिल्ह्यातील मोतीहारी गावचे आहेत. सन २००७ मध्ये ते आएएस झाले आणि त्यांची आयएएसमध्ये निवड झाली. राम यांची पहिली नियुक्ती नांदेड येथे झाली होती. त्यानंतर त्यांनी यवतमाळ जिल्हा परिषदेत दोन वर्षे काम केले.

पुढे ते बीड आणि छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते. २०२० मध्ये नवल किशोर राम हे पुण्याचे जिल्हाधिकारी होते. कोरोना संकाटाच्या काळात त्यांनी स्वतः गावोगावी जाऊन भेटी दिल्या होत्या. देशभरातील सर्वोत्तम जिल्हाधिकारी म्हणून देखील त्यांना सन्मानित करण्यात आलेलं आहे.

त्यामुळेच पुण्यातून त्यांची थेट पंतप्रधान कार्यालयात उपसचिवपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. आता केंद्रीय प्रतिनियुक्तीवरुन राज्य शासनाकडे रुजू झाल्यानंतर त्यांची नियुक्ती पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तपदी करण्यात आलेली आहे. कोरोना काळातील त्यांचं काम पुणेकरांनी जवळून बघितल्याने एक चांगला अधिकारी लाभल्याच्या सर्वांच्या भावना आहेत.

# पुणे रेल्वे स्थानकासह तीन ठिकाणी बॉम्बची धमकी; फोन करणाऱ्याचा शोध सुरू

पुणे । प्रतिनिधी

पुणे रेल्वे स्टेशन, भोसरी आणि येरवडा येथील चैतन्य महिला मंडळ परिसरात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देणारा निनावी फोन कॉल बुधवारी (दि. २०) रात्री पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला आल्याने खळबळ उडाली. या धमकीनंतर पोलिस यंत्रणा तात्काळ सतर्क झाली असून, संबंधित ठिकाणी बॉम्ब शोध पथक (बीडीडीएस) आणि श्वान पथकाने तपासणी करत परिसर पिंजून काढला. प्राथमिक तपासात हा कॉल खोडसाळपणाचा असल्याचा संशय असून, पोलिस कॉलरचा शोध घेत आहेत.




नियंत्रण कक्षाला रात्री आलेल्या निनावी कॉलमध्ये, पुणे रेल्वे स्टेशन, भोसरी आणि येरवड्यातील चैतन्य महिला मंडळ येथे स्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली. कॉलरने ही माहिती सांगून फोन कट केला. नियंत्रण कक्षाने तात्काळ बंडगार्डन, भोसरी आणि येरवडा पोलीस ठाण्यांना सूचित केले.

यानंतर पोलिस, बीडीडीएस आणि श्वान पथकाने संबंधित ठिकाणी तपासणी केली. बंडगार्डन पोलिसांनी रेल्वे स्टेशन परिसराची कसून झाडाझडती घेतली. दरम्यान, कॉल करणाऱ्या व्यक्तीचा मोबाइल क्रमांक त्वरित ट्रेस करण्यात आला. हा क्रमांक एका महिलेच्या नावावर असून, तो मोबाइल उल्हासनगर-कुर्ला प्रवासात हरवल्याचे समोर आले आहे. पोलिसांना संशय आहे की, या मोबाइलचा वापर करून दुसऱ्या व्यक्तीने हा खोडसाळपणा केला असावा. बंडगार्डन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र गायकवाड यांनी सांगितले की, कॉलरचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे.

# तुरुंगातील हगवणेला रंगीला पंजाब धाब्यातून जेवण, वैष्णवीच्या वडिलांनी सुप्रिया सुळेंपुढे मांडली कैफियत

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील वैष्णवी हगवणे मृत्यूप्रकरणात आत्तापर्यंत तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. मात्र, या आरोपींचे लाड पोलिसांकडून पुरवले जात आहेत. आरोपींना तुरुंगात धाब्यावरुन जेवण मिळत असल्याचा आरोप वैष्णवीच्या वडिलांना केला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे वैष्णवीच्या वडिलांना फोन करुन मी तुमच्या पाठीशी आहे, खंबीरपणे आपण या प्रकरणात लढणार आहोत, असे म्हणत धीर दिला. त्यावेळी, वैष्णवीच्या आई-वडिलांना अश्रू अनावर झाले होते. दरम्यान, वैष्णवीच्या आत्महत्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाचे पदाधिकारी राजेंद्र हगवणे यांच्यावरही गुन्हा दाखल झाला आहे. मात्र, ते सध्या फरार असून पोलीस शोध घेत आहेत. सासरच्या जाचाला कंटाळूनच आपल्या लेकीनं जीवन संपवल्याचा आरोप वैष्णवीच्या वडिलांनी केल्यानंतर हगवणे कुटुंबातील ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



शरद पवार यांच्या पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी वैष्णवी यांच्या आई-वडिलांशी फोनद्वारे संवाद साधला आहे. वैष्णवी यांच्या आई वडिलांच्या भावना जाणून घेतल्या. तसेच त्या हजर राहू शकल्या नाहीत त्याबद्दल दिलगिरी देखील व्यक्त केली आहे. या प्रकरणी आरोपीला कठोर शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचं सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. आरोपींना धाब्यावरून जेवण दिले जात असल्याचा आरोप यावेळी वैष्णवीच्या आई-वडिलांनी केला आहे. याबाबत देखील आम्ही दखल घेऊ असं सुप्रिया सुळे यांनी सांगितलं. ही लढाई आता तुमची एकट्याची नाही, आम्ही देखील तुमच्यासोबत आहोत, असे सुप्रिया सुळेंनी म्हणतात वैष्णवीच्या आई-वडिलांनी हात जोडून सुप्रिया सुळेंपुढे आपली कैफियत मांडली. ताई, आता आमच्या मुलीला न्याय द्या, एवढीच मागणी आहे. तर, अटकेत असलेल्या तीन आरोपींना हॉटेलचं जेवण दिलं जात आहे, रंगीला पंजाब हॉटेलमधून ह्या आरोपींना जेवण दिलं जातंय, असे वैष्णवीच्या वडिलांनी म्हटले. त्यावर, प्रशांत जगताप यांना सुप्रिया सुळेंनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. तसेच, मी लवकरच भेटायला येईल, असेही सुप्रिया सुळेंनी म्हटलं.

राजेंद्र तुकाराम हगवणे यांनी मुलीच्या घरच्यांकडून ५१ तोळे सोने, फॉरच्युनर गाडी, चांदीची भांडी घेतली. एवढंच नाही तर सनीज वर्ल्ड या ठिकाणी लग्न करुन देण्याच्या बोलीवर मुलीशी लग्न करुन दिलं, अशी माहिती एफआयरमधून समोर आली आहे.त्याचबरोबर ते सर्वजण कोणत्याही कारणात्सव वाद घालून तिच्याबरोबर भांडण करत. लग्न झाल्यानंतर साधारण चार पाच महिन्यांनी सासू लता हगवणे यांनी चांदीची भांडी मागीतली ती दिली नाहीत म्हणुन त्याचा राग मनात धरुन सून वैष्णवीस घालुन पाडुन बोलून तिचे चारित्र्यावर संशय घेत सासु लता, नंनद करीश्मा हागवणे, सासरे राजेंद्र हागवणे, दिर सुशील हगवणे यांनी शारीरीक व मानसिक त्रास देणं सुरू केलं, अशी माहिती एफआयआरमध्ये देण्यात आली आहे.

# पुण्यात अनोख्या आंदोलनाची चर्चा..! शरद पवार गटाच्या कार्यकर्त्याने थेट रस्त्यावर साचलेल्या पाण्यातून चालवली होडी

पुणे । प्रतिनिधी

काल मंगळवारी झालेल्या तुफान पावसामुळे पुणे शहरातील रस्त्यांना नदीचे स्वरुप आले होते. शहरातील प्रमुख रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहन चालकांना वाहन चालवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. पावसामुळे शहरातील जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले होते. मंगळवार दुपारपासून जोर धरलेल्या पावसाने आज पहाटे विश्रांती घेतले आहे.





पुणे शहरातील हडपसर भागात देखील पावसाचा कहर पाहायला मिळाला. येथील विविध भागातील रस्त्यांवर पाणी आल्याने वाहन चालविताना वाहनधारकांची मोठी दमछाक झाली. मान्सूनपूर्व पावसाने प्रशासनाने राबविलेल्या पावसपूर्व कामांची पोल खोल केली आहे. यामुळे पावसाळ्यापूर्वी करण्यात आलेल्या कामाचा पूरता बोजवारा उडल्याचे चित्र पाहायला मिळाले. याचा निषेध पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांने होडी आंदोल करून नोंदविला आहे. सध्या या अनोख्या आंदोलनाची पुण्यात जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे कार्यकर्ते गजेंद्र बाबा मोरे यांनी मांजरी येथे प्रशासनाच्या निषेध नोंदविण्यासाठी रस्त्यावर साचलेल्या पाण्यात होडी चालवून होडी आंदोलन केले. महापालिका आणि पीएमआरडीच्या निषेधार्थ हे होडी आंदोलन करण्यात आले. या अनोख्या आंदोलनाने प्रशासन गडबडून गेले आहे.

मांजरी बुद्रुक येथील मुळा मुठा नदीवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने पूल बांधण्यात आला आहे. तर पुलाच्या पुढील भागात पीएमआरडीएने रस्ता केला आहे. सध्या मांजरी बुद्रुक ग्रामपंचायत ही पुणे महानगरपालिकेत गेल्याने या ठिकाणी पुणे महानगरपालिकेचा कारभार सुरू आहे. या तीनही विभागात समन्वय नसल्याने या ठिकाणीचे काम अर्धवट असून प्रत्येक पावसाळ्यात पूलाच्या या भागात मोठ्या प्रमाणात पाणी साठून राहत आहे. परिणामी साठलेल्या पाण्यातून पायी ये - जा करणाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पाण्यातून दुचाकीही बाहेर काढणे जिकरीचे ठरत आहे. त्यामुळे तिन्ही विभागांचे लक्ष वेधण्यासाठी मांजरी बुद्रुक येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार चे पदाधिकारी गजेंद्र बाबा मोरे यांनी आज या साचलेल्या पाण्यात बोट सोडून अनोखे आंदोलन केले.

# चार दिवस, चार आरोपी अन् चार हजार किलोमीटरचा थरार!

पिंपरी: किचकट गुन्ह्याच्या छडा लावत पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी अवघ्या चार दिवसात तब्बल ४ हजार किलोमीटरचा प्रवास करून चार आरोपींना अटक केली. धाराशिव, लातूर आणि राजस्थानमधील जयपूर व भिलवाडा येथे सापळे रचून ही कारवाई करण्यात आली.



या आरोपींनी बनावट शेअर ट्रेडिंग ॲपच्या माध्यमातून नागरिकांची ७१ लाख रुपयांची फसवणूक केली होती. या प्रकरणात आंतरराज्यीय टोळी कार्यरत असून, आंतरराष्ट्रीय आर्थिक साखळीचेही धागेदोरे उलगडण्याची शक्यता आहे. (डरींशीं झळाळि छ्शुी)

या फसवणुकीची सुरुवात फिर्यादीस थहर्ïी-ïï 'डचउ त्रेथेलरश्र डशलींळींळशी' या नावाने सामील करून करण्यात आली. त्यानंतर -ïîïr चरु' या बनावट ट्रेडिंग ॲपवर गुंतवणुकीचं आमिष दाखवण्यात आलं.

सातत्याने नफा मिळवून देण्याचं आश्वासन देत त्यांच्याकडून टप्प्याटप्प्याने तब्बल ७१ लाख रुपये उकळण्यात आले. यावरून रितु व्होरा, हरीश सिंग, अजय गर्ग आणि अन्य अज्ञातांविरोधात सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान एक महत्त्वाचा धागा मिळाला. आयडीएफसी बँकेच्या एका खात्यावर दोन दिवसांत तब्बल ३.२५ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचे निष्पन्न झाले. त्याचा तपास करताना पोलिसांना हे खाते धाराशिव येथील अलफहाद आरिफ मोमीन (२७, रा. मिल्ली कॉलनी) यांच्या नावे असल्याचे आढळले. पोलिसांनी त्वरित धाराशिवला धाव घेत अलफहादला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने हे खाते अजय ऊर्फ शिवप्रसाद मलिकार्जुन खुदासे (३९, रा. लातूर) यांच्या सांगण्यावरून उघडल्याचे सांगितले.त्यानंतर पोलिसांचे पथक लातूर येथे गेले आणि खुदासेला ताब्यात घेतले. चौकशीत खुदासेने सांगितले की, संबंधित खाते सुर्या ऊर्फ राहुलसिंग कर्णावत (रा. झुझुनू, राजस्थान) याच्या हवाली केले होते. या माहितीच्या आधारे पथकाने जयपूर शहरात पोहोचून कौशल्याने सापळा रचून राहुलसिंगला अटक केली.दरम्यान, राहुलसिंगने हा संपूर्ण गुन्हा प्रेमशंकर बलदेव बैरागी (रा. भिलवाडा, राजस्थान) याच्या मदतीने केला असल्याची कबुली दिली. पोलिसांनी तत्काळ भिलवाडा येथे धाव घेत प्रेमशंकरलाही अटक केली.

# शिरूर बसस्थानकावर पाच लाखाचे दागिने चोरणाऱ्या दोन महिला जेरबंद

शिरूर - शिरूर बसस्थानकावरील गर्दीचा गैरफायदा घेत बसमध्ये चढत असलेल्या महिलेच्या आजूबाजूला पाळत ठेवून तीच्याकडील पर्समधील रूमालात बांधलेले मंगळसूत्र व कर्णफूले असे पाच लाख रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून पलायन केलेल्या दोन महिलांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.




पुणे ग्रामीण पोलिस दलातील स्थानिक गुन्हे शाखा व शिरूर पोलिस ठाण्याच्या तपास पथकाने गेले आठ दिवस अखंड मेहनत करून, शंभरहून अधिक सीसीटीव्ही फूटेजची तपासणी करीत ही कारवाई केली.

मनिषा विजय कसबे व शोभा शंकर दामोदर (दोघी रा. संजय नगर, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) अशी अटक केलेल्या चोरट्यांची नावे असून, दोघीही सराईत असल्याचे पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी सांगितले. गेल्या रविवारी (ता. ११) शिरूर बसस्थानकावर चोरीची ही घटना घडली होती.

याबाबत रूपाली अनिल काळेल (रा. त्रिमूर्ती नगर, भिगवण रस्ता, बारामती) यांनी फिर्याद दिली होती. त्या, शिरूर तालुक्यातील मलठण येथे भाच्याच्या लग्नसोहळ्यानिमीत्त आल्या होत्या. सोहळा उरकून परत बारामती येथे जाण्यासाठी त्या शिरूर बसस्थानकावर एसटी बसची वाट पाहात असताना संशयित महिलांनी त्यांच्यावर पाळत ठेवली.

व फलाटावर लागत असलेल्या बारामतीच्या बसमध्ये त्या चढत असतानाच गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या पिशवीतील दागिने असलेली पर्स अलगद काढून पोबारा केला होता, अशी माहिती केंजळे यांनी दिली. चोरीला गेलेल्या पर्समध्ये साडेसहा तोळे वजनाचे गंठण व सव्वा तोळे वजनाची कर्णफूले असे सोन्याचे दागिने होते.

पाच लाख रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याबाबत गुन्हा दाखल झाल्यानंतर शिरूर पोलिस ठाण्याच्या तपास पथकाबरोबरच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानेही समांतर तपास केला. शिरूर बसस्थानकासह तालक्याच्या काही भागात व अहिल्यानगर जिल्ह्यात ठिकठिकाणी सुमारे शंभरहून अधिक सीसीटीव्ही फूटेज पोलिसांनी तपासले.

यात चोरीच्या घटनेनंतर शिरूर बसस्थानकात आलेल्या एका मोटारीवर व तीमध्ये बसत असलेल्या दोन संशयित महिलांवर फोकस केल्यानंतर तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे चोर महिलांची पाळेमुळे खोदून काढत पोलिस पथकाने त्यांना चोरून नेलेल्या ऐवजासह त्यांच्या घरातूनच जेरबंद केले.

# पूजा खेडकरला सर्वोच्च न्यायालया कडून अटकपूर्व जामीन मंजूर

संपूर्ण राज्याला आणि देशाला हादरवून टाकणाऱ्या पूजा खेडकर प्रकरणात मोठी बातमी समोर आली आहे. आयएएस परीक्षेत गैरप्रकार केल्याचा आरोप असलेल्या पूजा खेडकर यांना सर्वोच्च न्यायालयाने अटक पूर्व जामीन मंजूर केला आहे. आयएएस परीक्षेत अपंगत्व आणि ओबीसी आरक्षणाचा चुकीच्या पद्धतीने फायदा घेतल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे.



तिने असा कोणता गंभीर गुन्हा केला आहे? ती ड्रग्ज माफिया किंवा दहशतवादी नाही. खून (३०२) केलेला नाही. ती एनडीपीएस गुन्हेगार नाही. तुमच्याकडे एक सिस्टम किंवा सॉफ्टवेअर असायला हवं. तुम्ही चौकशी पूर्ण करा. तिने सर्वस्व गमावलं आहे आणि तिला कुठेही नोकरी मिळणार नाही, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं आहे.

पूजा खेडकरने आयोग आणि जनतेची फसवणूक केली आहे, असं कारण देत दिल्ली पोलिस आणि यूपीएससीने तिच्या अटकपूर्व जामिनाला विरोध केला होता. दिल्ली उच्च न्यायालयानेही अटकपूर्व जामीन याचिका फेटाळून लावली होती. अंतरिम संरक्षण काढून घेतले होते. यूपीएससीने उमेदवारी रद्द करून पूजा खेडकरला भविष्यातील कोणत्याही परीक्षा देण्यास मनाई केली होती. केंद्र सरकारने आयएएस (प्रोबेशन) नियमांच्या नियम १२ चा हवाला देऊन तिला भारतीय प्रशासकीय सेवेतून मुक्त केलं आहे.